पाक्षिक

प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 12 । 16 जून, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.




# विधानसभा जिंकेपर्यंत थांबायचं नाही



## अध्यक्षीय मनोगत

# नव्या जिद्दीने कामाला लागू

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांनी ऐतिहासिक विक्रमाची बरोबरी केली आहे. त्यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. यापूर्वी साठ वर्षांपूर्वी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. मोदीजींच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा एनडीएला लोकसभा निवडणुकीत पूर्ण बहुमत मिळाले. मोदी सरकारचा शपथविधी कार्यकर्त्यांच्या उत्साहामुळे गाजला. विकसित भारताचा अजेंडा घेऊन आपण मोदीजींच्या नेतृत्वात जनतेसमोर लोकसभा निवडणुकीत गेलो. देशभरात ठिकठिकाणच्या जनतेने मोदीजींना आशिर्वाद दिला. लोकसभा निवडणुकीतील यशासोबत भाजपाला ओदिशा विधानसभा निवडणुकीत पूर्ण बहुमत मिळणे ही आणखी एक ऐतिहासिक घटना घडली. त्यासोबत अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपाला पूर्ण बहुमत मिळाले. दक्षिणेत आंध्र प्रदेश विधानसभा निवडणुकीत तेलुगू देसमचे नेते चंद्रबाबू नायडू यांच्या नेतृत्वात एनडीएने दणदणित बहुमत मिळविले व घटकपक्ष म्हणून भाजपा सत्ताधारी झाला. केरळमध्ये भाजपाने लोकसभा निवडणुकीत खाते उघडणे हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य आहे. तामिळनाडूत भाजपाचा उमेदवार विजयी झाला नसला तरी त्या राज्यात भाजपाला ११ टक्के मते मिळाली असून पक्षाने आगामी काळात यशस्वी झेप घेण्यासाठी उत्तम पाया रचला आहे. निवडणुकीतील यश हे जिंकलेल्या जागांवरून मोजले जाते, हे सत्य आहे. पण निवडणुकीच्या राजकारणात मतांचा पाया महत्त्वाचा असतो. मुळात जनाधार भक्कम असेल तर त्या आधारावर पुढचे डावपेच खेळून मतांचे रुपांतर विजयी जागांमध्ये करता येते. त्या दृष्टीने विचार करता, महाराष्ट्रात भाजपाच्या अपेक्षित जागा जिंकल्या नसल्या तरी मतांच्या बाबतीत समाधानकारक स्थिती आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला जेवढी मते मिळाली जवळपास तेवढीच मते या निवडणुकीत मिळाली आहेत. भाजपा एक कोटी ४९ लाख मते मिळवून राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे तर राज्यात सर्वाधिक तेरा जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला ९७ लाख मते मिळाली आहेत. महायुती व महाविकास आघाडीच्या एकूण मतांचा विचार केला तर महायुतीला केवळ दोन लाख मते कमी मिळाली आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील १३० विधानसभा मतदारसंघात महायुती आघाडीवर आहे. अर्थात, विधानसभा निवडणुकीत यशस्वी होण्यासाठी आपल्याला पुरेसा पाया उपलब्ध आहे. लोकसभा निवडणुकीत जो खोटा नॅरेटीव्ह आपल्याविरोधात चालविण्यात आला तो पुन्हा विधानसभा निवडणुकीत चालविता येणार नाही. आपल्याकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लोकप्रिय नेतृत्व आहे. राज्यातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारची कामगिरी आपल्याकडे आहे. विकासाची निश्चित दृष्टी आहे. खोट्या नॅरेटीव्हचा धोका आपण ओळखला आहे. लोकसभा निवडणूक निकालांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला अनेक गोष्टी ध्यानात आल्या आहेत. त्यामुळेच आपल्याला गेल्या दोन निवडणुकांप्रमाणेच या विधानसभा निवडणुकीतही यश मिळवून विजयाची हॅटट्रिक करण्याची संधी आहे. नव्या जिद्दीने कामाला लागू आणि आगामी विधानसभा निवडणुकीत विजयाचा झेंडा फडकवू.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग










०४ विधानसभा जिंकेपर्यंत थांबायचं नाही

०८ देवेंद्रजी, तुमच्याशिवाय सरकार मान्य नाही

०९ मुंबई पदवीधर मतदारसंघात विजय मिळवणारच






१२ धन्यवाद भारत...

१७ मोदी हे सर्वसमावेशक नेते

२० हा कौल मोदींच्या नेतृत्वालाच






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# विधानसभा जिंकेपर्यंत




● उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भाजपा प्रदेश विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन. या बैठकीला प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, विधान परिषद गटनेते प्रविण दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. श्री. फडणवीस यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश...

आपल्या विधीमंडळ पक्षाची बैठक होत असताना आपण सर्वजण अत्यंत आनंदी आहोत. देशाचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी हे सलग तिसऱ्यांदा शपथ घेणार आहेत. ६० वर्षानंतर प्रथमच एकाच पक्षाचा पंतप्रधान सलग तिसऱ्यांदा सत्तेत येत आहे. सलग तीनवेळा पंतप्रधानपद भूषवण्याचा पं.नेहरू यांच्या नावावर आहे या विक्रमाची नरेंद्र मोदी यांनी बरोबरी केली आहे. श्री. मोदी यांचे अभिनंदन करण्यासाठी आपण एकत्र आलो आहोत. मोदीजींच्या विजयाबद्दल आनंद असताना मनात सलही आहे. या विजयात आपण सिंहाचा वाटा उचलू शकलो नाही, याची खंत आपल्यापैकी प्रत्येकाला वाटते आहे. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत मोलाचा वाटा आपला होता. यावेळी तसे झालेले नाही. म्हणून या निवडणुकीतील आपल्या कामगिरीचे पुनरावलोकन व्हावे आणि आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रणनिती तयार करता यावी, यासाठीही आजची बैठक महत्वाची आहे. विधानसभा

# थांबायचं नाही





निवडणुकीत पुन्हा महायुतीचे सरकार आणण्याचा निर्धार केल्याबद्दल मी आपणां सर्वांचे आभार मानतो. उन्हाळा संपत आला आहे, पावसाळा जवळ आला आहे. या काळात पाऊस पडत असताना जे पेरले जात ते उगवत असत. त्यामुळे नव्याने 'पेरण्याची' वेळ आली आहे. आपण सर्वांनी माझ्यावर विश्वास व्यक्त केल्याबद्दल मी आपणां सर्वांचा आभारी आहे. यशाचे बाप अनेक असतात, पण अपयश ताकदीने अंगावर घ्यायचे असते, पचवायचे असते आणि नव्याने यश मिळवण्याचा निर्धार करावयाचा असतो. लोकसभा निवडणुकीत आपल्या पक्षाचे नेतृत्व मी करत असल्यामुळे या निकालाची जबाबदारी संपूर्णपणे माझी आहे. ही जबाबदारी स्वीकारून मला सरकारमधून मुक्त करावे आणि पक्षाचे काम करण्याची संधी द्यावी, असे जेव्हा मी म्हणालो तेव्हा त्यामागे निराशेची भावना नव्हती. देवेंद्र फडणवीस हा पळणारा माणूस नाही, तो लढणारा आहे. या निवडणुकीत उत्तम काम केल्याबद्दल मी प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार तसेच संपूर्ण राज्यातील कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. तुम्ही सर्वांनी अतिशय उत्तम काम केले. केवळ राजकीय गणित जुळवाजुळवीत आपण कुठेतरी कमी पडलो. कुणाला असं वाटत असेल की मी निराशेच्या, भावनेच्या भरात बोललो असेन तर ते खरं नाही. शत्रूंकडून चहूबाजूने घेरले गेल्यानंतर पुरंदरचा तह करणारे आणि तहानंतर पूर्ण ताकदीने मैदानात उतरून सर्व किल्ले पुन्हा जिंकून घेणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आदर्श आहेत. माझ्या डोक्यात काही रणनिती होती, ती आजही आहे. अमितभाई शाह यांना भेटून माझ्या डोक्यात काय आहे, हे मी स्पष्ट केले आहे. त्यांनी मला सांगितले आहे की, तुमचं काम चालू राहू द्या. महाराष्ट्राची रणनिती आपण त्यानंतर तयार करू. राज्यातील निकालानंतर एक मिनिटही मी शांत बसणार नव्हतो आणि बसणार नाही. मी काम करतच आहे आणि करणार आहे.

संपूर्ण देशाचे चित्र पाहिले तर जनतेने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वालाच कौल दिला आहे. इंडि आघाडीतील सर्व पक्षांनी मिळून जेवढ्या जागा मिळवल्या आहेत त्यापेक्षा जास्त जागा एकट्या भाजपाला मिळाल्या आहेत. राज्यात महविकास आघाडीला ४३.९ तर महायुतीला ४३.६ टक्के मते मिळाली आहेत. केवळ २ लाखाची मतांची आघाडी महविकास आघाडीला आहे. फरक एवढाच आहे की, आघाडील ३१ तर महायुतीला १७ जागा मिळाल्या आहेत. मुंबईत महायुतीला २६ लाख तर महाविकास आघाडीला २४ लाख मते मिळाली आहेत. आपण २ लाखांची आघाडी घेऊनही मुंबईत फक्त दोन जागा आपल्याला मिळाल्या आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीबरोबरच आपल्याला खोट्या नरेटीव्हचाही सामना करावा लागला. आपला चौथा प्रतिस्पर्धी खोट्या नरेटीव्हच्या रूपाने निवडणुकीच्या रिंगणात होता. या अपप्रचाराला उत्तर देण्यात आपण कमी पडलो, पण अशा खोट्या मुद्यांची ताकद एखाद्या निवडणुकीतच चालते, ती वारंवार चालत नाही. संविधान बदलाचा प्रचार जोमाने केला गेला. दलित,



आदिवासी समाजात हा अपप्रचार प्रसरला. या अपप्रचाराला आपण रोखू शकलो नाही. अशा पद्धतीने खोटा प्रचार होईल, हे आपल्याला अपेक्षितच नव्हते. त्यामुळे त्याला तोंड देण्याची आपली तयारीच नव्हती. त्याचा फटका आपल्याला बसला. पण एक गोष्ट लक्षात ठेवा, अपप्रचाराचे असे मुद्दे एखाद्या निवडणुकीपुरते टिकतात. काही दिवसांनी या मुद्यांची ताकद ५०-६० टक्क्यांनी कमी होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेत आल्यापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा सन्मानच केला आहे. संविधान दिन साजरा करण्याची पद्धत मोदी सरकारच्या कार्यकाळातच सुरू झाली आहे. भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्याची घोषणाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. असे असतानाही मोदी सरकार संविधान बदलणार असा प्रचार केला गेला. पक्ष फुटीवरून तसेच मराठा समाजाच्या आरक्षणावरूनही आपल्या विरोधात खोटा प्रचार झाला. मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला घटनेच्या चौकटीत बसणारे आरक्षण दिले गेले. सर्वोच्च न्यायालयातही पहिल्या सुनावणीत या आरक्षणाला वैधता मिळाली होती. पुढे महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षण टिकवण्यासाठी योग्य पद्धतीने बाजू मांडण्याची जबाबदारी महाविकास आघाडी सरकारने योग्य पद्धतीने पार पाडली नाही, म्हणून हे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द ठरविले गेले. तरीही आपल्या विरोधात प्रचार केला गेला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतरही आमच्या सरकारने मराठा समाजाच्या मागणीनुसार आरक्षण दिले. मी मुख्यमंत्री असताना राज्य सरकारकडून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या. सारथी महामंडळामार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देण्याचा निर्णय मी मुख्यमंत्री असताना घेतला गेला. मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णयही आमच्या सरकारनेच घेतला. ज्यांनी मराठा आरक्षणला कायम विरोध केला अशांना मते मिळाली. मात्र आम्ही या समाजासाठी एवढं काम करूनही आमच्या विरोधात अपप्रचार केला गेला, याचे वाईट वाटते. या अपप्रचारामुळे मतदारांनी आपल्याकडे मोठ्या प्रमाणात पाठ फिरवली, असं चित्र निवडणुकीच्या निकालातून दिसत नाही. आपला सगळा मतदार विरोधकांकडे गेला असता तर आपल्याला ४३ टक्के मते मिळालीच नसती. राज्यातील उद्योग धंदे अन्य राज्यात गेल्याचा अपप्रचारही झाला. पण एक गोष्ट लक्षात ठेवा २०२२-२३, २०२३-२४ या दोन वर्षात देशात सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. कर्नाटक, गुजरात या राज्यांनी काही वर्षापूर्वी औद्योगिक गुंतवणुकीबाबत महाराष्ट्राला मागे टाकले होते. मात्र आता चित्र पालटले आहे. तरीही अन्य राज्यात उद्योग गेल्याचा



अपप्रचार केला गेला. शिवसेनेतील फुटीमुळे उद्धव ठाकरे यांना राज्यभर सहानुभूती मिळते आहे, असेही राज्यभर पसरवलं गेले. त्यांना सहानूभूती असती तर कोकण आणि मुंबईत उबाठाला एवढा पराभव स्वीकारावा लागला नसता. ठाणे, पालघर, रत्नागिरी–सिंधुदुर्ग, रायगडमध्ये 'उबाठा'ला एकही जागा मिळू शकली नाही. उबाठा गटाला मुंबईत विशिष्ट धर्मियांच्या मतांमुळेच विजय मिळाला आहे. मुंबईतल्या मराठी माणसाने 'उबाठा'ला कौल दिलेला नाही. मराठी माणसाने एकजुटीने 'उबाठा'ला मतदान केले असते तर मुंबईत, कोकणात मराठी सर्व जागी आघाडीला विजय मिळाला असता. मराठी माणसाने एकत्र येऊन उबाठाला मते दिली असती तर शिवडीत 'उबाठा'ला ३०–३५ हजारांची तर ईशान्य मुंबईत उबाठा उमेदवाराला ६० हजारांची आघाडी मिळाली असती. याचा अर्थ मराठी माणूस 'उबाठा'बरोबर नाही. मुंबई महानगर क्षेत्रातून (एमएमआरए) 'उबाठा'ची हकालपट्टी झाली आहे. 'उबाठा'चे खासदार बंडू जाधव यांनी मराठा आणि दलित मतांमुळे नव्हे तर मुस्लिम मतांमुळेच आपण निवडून आलो आहे, असे जाहीरपणे सांगितले आहे. निवडणूक संपल्यानंतर उबाठा उमेदवार मराठा समाजाची गरज संपल्यासारखे बोलू लागले आहेत. उत्तर मध्य मुंबईत एक टक्क्यांपेक्षा कमी मतांनी आपण पराभूत झालो. ईशान्य मुंबई, अमरावतीमध्ये आपण तीन टक्क्यांपेक्षा कमी मतांनी पराभूत झालो. १० मतदारसंघात आपण ५ टक्क्यांपेक्षा कमी मतांनी पराभूत झालो आहोत. धुळे, लातूर, भंडारा, नगर, भिवंडी, अमरावती, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, बीड, नांदेड या त्या १० जागा आहेत. विरोधकांना लोकसभेच्या ३१ जागा मिळाल्या असताना आपल्याला १३३ विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळाली आहे. ही आकडेवारी पाहिल्यावर आपण पराभूत झालो आणि महाविकास आघाडी विजयी झाली, हा प्रचार खोटा आहे. महायुतीत ज्या–ज्या ठिकाणी समन्वयाचा अभाव होता त्याची माहिती मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना देणार आहे. सर्वाधिक म्हणजे ७६ विधानसभा मतदारसंघात भाजपाला आघाडी मिळाली आहे. लोकसभेच्या ९ जागा मिळालेला पक्ष अजूनही राज्यातील एक क्रमाकांचा पक्ष आहे, हेच यातून दिसते आहे. निवडणुकीत जय–पराजय अपरिहार्य आहे. मात्र पराजय झाल्यावर त्याचे खापर एकमेकांच्या डोक्यावर फोडायचं नसते. महायुतीच्या सर्व पक्षाच्या प्रवक्त्यांनी समजून–उमजून बोलले पाहिजे. जाहीरपणे उणीदुणी काढण्याची ही वेळ नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनाही मी ही गोष्ट सांगितली आहे. लोकसभा निवडणुकीतील कामगिरीचे स्वतंत्रपणे विश्लेषण करण्याची गरज नाही. आपण सर्वांनी एका सुरात बोलले पाहिजे, असे मी त्यांना सांगितले आहे. निकालाच्या दुसऱ्या दिवशीपासून मी कामाला लागलो आहे. तुम्हीही कामाला लागा. विधानसभा निवडणुकीत आपल्याला तीन ते साडेतीन टक्के मते अधिक मिळवायची आहेत. राजकीय गणितांची जुळवाजुळव करण्यासाठी आणखी दीड टक्के मते मिळवावीच लागणार आहेत. लोकसभा निवडणुकीत मिळालेली मते कायम ठेवून ही दीड टक्का अधिक मते मिळवली तर विधानसभा निवडणुकीत आपला विजय पक्का आहे. महायुतीचा झेंडा महाराष्ट्रात पुन्हा रोवत नाही तोपर्यंत मी थांबणार नाही, तुम्हीही थांबू नका. विधानसभेत आपण चांगली कामगिरी करणार आहोत, असा मला विश्वास आहे.

**जय हिंद जय महाराष्ट्र**

# देवेंद्रजी, तुमच्याशिवाय सरकार मान्य नाही




**उपमुख्यमंत्री** पदावरून मुक्त करावे, अशी विनंती करून देवेंद्रजींनी आम्हा सर्वांना धक्का दिला. तुमची आमदार पदापासूनची कारकीर्द, प्रदेश अध्यक्षपदापर्यंतची वाटचाल, त्यानंतर मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी, विरोधी पक्षनेतेपद आणि आता उपमुख्यमंत्रीपद हा प्रवास पाहिल्यावर तुम्ही कायम कार्यकर्त्यांना आणि आमदारांना मोठं करण्यासाठी किती झटला आहात, हे मी पाहिले आणि अनुभवलेही आहे. स्वत:ला मागे ठेवून तुम्ही सर्वसामान्य कार्यकर्ता, आमदार पुढे गेला पाहिजे, या दृष्टीने सदैव वागलात. त्यामुळेच तुमचे नेतृत्व राज्यात रूजले गेले. २०१४ मध्ये राज्यात ४२ खासदार आणि १२२ आमदार हा विक्रम मोदींच्या नेतृत्वात देवेंद्रजींनीच केला. मुख्यमंत्री असताना भेटायला आलेला शेवटचा माणूस घरी जात नाही तोपर्यंत 'वर्षा'वरचे दिवे बंद होत नव्हते, हे आम्ही पाहिले आहे. घरातून बाहेर न पडणारा मुख्यमंत्री महाराष्ट्राने पाहिला आहे. विरोधी पक्षनेते असतानाही पायाला भिंगरी लावून तुम्ही संकटप्रसंगी राज्यभर भ्रमंती केली. पक्षाने सांगितले म्हणून इच्छा नसतानाही उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. त्यामुळे तुम्ही सरकारमध्ये न राहणे हे आम्हाला कदापि मान्य नाही. एखाद्या सामन्यात कमी धावा झाल्या म्हणून सचिन तेंडुलकरचा दर्जा कमी होत नाही, उंची कमी होत नाही. तुम्ही आम्हा सर्वांचे सचिन तेंडुलकरच आहात. आमचं म्हणणं तुम्हाला ऐकावंच लागेल. सरकारमधून बाहेर पडण्याची विनंती करण्याचा निर्णय तुम्हाला मागे घ्यावाच लागेल. हा निर्णय मागे घेतल्याचे आजच जाहीर करा. याबाबतीत आम्ही तुमचे ऐकणार नाही.

**देवेंद्रजी** फडणवीस यांच्या राजकीय आयुष्याचा लेखा–जोखा मांडला जाईल तेव्हा २०१९ ते २०२४ या ५ वर्षात त्यांनी वेगवेगळ्या संकटांचा कसा मुकाबला केला, याचा गौरवशाली अध्याय लिहला जाईल. २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्रजींनी महाराष्ट्राच्या विकासाला प्रचंड गती दिली. समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, मुंबई मेट्रो यासारख्या प्रकल्पांचा पाया घातला. केवळ पक्षाचा आदेश म्हणून उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. म्हणूनच देवेंद्र फडणवीस यांच्या अनुपस्थितीमध्ये राज्य सरकार आम्हाला मान्य नाही. तुम्ही सरकारमधून बाहेर पडू नये, अशी भाजपा विधीमंडळ पक्षाची विनंती आहे.

(आमदारांच्या बैठकीत मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याशिवाय सरकार मान्य नाही, हा ठराव मांडताना व्यक्त केलेले मनोगत.)

**आ. नितेश राणे** यांनी आ. आशिष शेलार यांनी मांडलेल्या ठरावाला अनुमोदन दिले. आपण प्रत्येकाच्या मागे ताकदीने उभे राहिलात. राज्य सरकारबरोबरच पक्षातही तुम्ही आम्हाला पूर्ण ताकदीने हवे आहात, असे आ. नितेश राणे यांनी सांगितले.

**हा ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला.**

# मुंबई पदवीधर मतदारसंघात विजय मिळवणारच




● **उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

> मुंबई पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२४ चे भाजपा उमेदवार किरण शेलार यांच्या प्रचारार्थ रंगशारदा सभागृह, वांद्रे येथे आयोजित भाजपा विजय संकल्प मेळाव्यास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन केले.

**भाजपाला** किरण शेलार यांच्यासारखा तरुण, तडफदार, संघर्षातून उभा राहिलेला युवा उमेदवार मिळाला आहे. मुंबईच्या बीडीडी चाळीत जन्मलेल्या किरण शेलार यांना सामान्य मुंबईकरांच्या दुःखाची आणि त्यांच्या संवेदनांची जाणीव आहे. त्यांच्या विचारांची मांडणी ही अतिशय पक्की आहे. खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रवादाच्या विचारातून त्यांची जडणघडण झाली आहे. विविध जबाबदाऱ्या सांभाळत पत्रकारिता क्षेत्रात आपले विचार त्यांनी निर्भीडपणे शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवले आहेत. मला विश्वास आहे की, किरण शेलार यांच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला भाजपा कार्यकर्ते नक्कीच पाठींबा देतील. लोकसभा निवडणुकीत विरोधकांना खोटा अपप्रचार करण्यात यश मिळाल्याने त्याचा फटका अर्थात महायुतीला बसला. परंतु श्रध्देय अटलजी यांनी सांगितल्याप्रमाणे 'क्या हार में क्या जीत में किंचित नहीं भयभीत मैं, संघर्ष पथ पर जो मिले यह भी सही वह भी सही' या मार्गावर चालणारे आम्ही आहोत.

मला या गोष्टीचा अतिशय आनंद आहे की, पंडित नेहरूजी नंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान बनणारे हे मा. मोदीजी आहेत. या निवडणुकीत संपूर्ण इंडी आघाडीला मिळालेल्या जागांच्या तुलनेत एकट्या भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. महायुतीची लढाई ही एकट्या इंडी आघाडी सोबत नसून खोट्या अपप्रचारासोबत होती. हा अपप्रचार सतत चालणार नाही 'We Will Bounce Back'. आम्ही महाराष्ट्रात पुन्हा ताकदीने विधानसभा आणि महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजय मिळवून पालिकेवर भगवा झेंडा नक्कीच फडकवणार.

मुंबई पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२४ ही आपल्यासाठी एक सुवर्णसंधी आहे. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील अत्यंत महत्त्वाचे काम म्हणजे मतदार नोंदणी. या मतदारसंघात सर्वाधिक मतदार नोंदणी भाजपाने केली आहे. त्यामुळे या नोंदणीतील मतदाराला मतदान केंद्रापर्यंत पोहचवण्याचे काम

आपल्याला जबाबदारीने आणि पुढाकाराने करायचे आहे. या निवडणुकीत आपल्याला अपप्रचारावर विजय मिळवून मुंबईमध्ये एक नवीन वाटचाल सुरु करायची आहे. तसेच भाजपा सर्वसामान्य कार्यकर्त्याला निवडून आणू शकतो, हे देखील आपल्याला दाखवून द्यायचे आहे. मला खात्री आहे की, मुंबई पदवीधर मतदारसंघाचा आमदार हा भाजपाचाच असेल.

निवडणूक हरतो तेव्हा नेत्याची खऱ्या अर्थाने पारख होते. अशावेळी खचून न जाता इतिहासातून शिकायचे असते, पुढे जायचे असते. ती संधी मुंबई पदवीधर निवडणुकीच्या निमित्ताने चालून आलेली आहे. हा आपला हक्काचा मतदारसंघ आहे. तो काही कारणाने मित्रपक्षाला द्यावा लागला. पण आता आपली जागा आपल्याकडे आणण्याची सुवर्णसंधी आलेली आहे. गेले वर्षभर मुंबईतील सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जी मेहनत घेतली, त्या जोरावर विक्रमी मतदार नोंदणी झाली.

मतदार नोंदणीची पहिली लढाई आपण जिंकलो. आता त्यातील प्रत्येक मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचला पाहिजे याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने २५ मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्याची जबाबदारी घ्यावी. ही निवडणूक आपल्याला मनावर आणि डोक्यावर घ्यायची आहे. भाजपाचे कार्यकर्ते ताकदवान आणि क्षमतावान आहेत. असे कार्यकर्ते अन्य कोणत्याच पक्षात नाहीत. त्यामुळे 'फेक नरेटिव्ह'चे बारा वाजवायचे असतील, तर पदवीधरचा विजय अतिशय आवश्यक आहे. भाजपा सर्वसामान्य कार्यकर्त्याला निवडून आणू शकते, हा नरेटिव्ह आपल्याला सेट करायचा आहे. मला पूर्ण विश्वास आहे, मुंबई पदवीधर मतदारसंघात विजय आपलाच आहे.

सुशिक्षित, प्रज्ञावंत, लेखक, संपादक आणि मुंबईतल्या मातीतला खेळ खेळणारा एक खेळाडू, असा सर्वगुणसंपन्न असा चेहरा आपण मुंबई पदवीधर निवडणुकीत दिला आहे, असे मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी सांगितले. देवेंद्र फडणवीस यांनी किरण यांचे नाव का सुचवले, याचे गमक काही दिवसानंतर कळले. कारण ते वरळी विधानसभा मतदारसंघातून येतात, असा उपरोधिक टोलादेखील शेलार यांनी विरोधकांना लगावला. दरम्यान, सध्या युवासेना आणि अनिल परब यांच्यात संघर्ष सुरू आहे. त्यांनी केलेली नोंदणी परब यांना द्यायला ते तयार नाहीत. त्यामुळे ही मते किरण शेलार यांना पडणार आहेत, असेही ते म्हणाले. पदवीधरांचे आजवर न सुटलेले असंख्य मुद्दे सोडवण्यासाठी किरण शेलार कटिबद्ध आहेत असे सांगतानाच एक 'तरुण' कार्यकर्ता विधानपरिषदेत आपला आवाज बुलंद करणार आहे, असा विश्वासदेखील आशिष शेलार यांनी व्यक्त केला. केळीचे झाड लावायचे आणि त्याला रताळी किती आली, असे विचारायचे, ही उद्धव ठाकरेंच्या भाषणाची पद्धत आहे. असे सांगतानाच पदवीधरच्या मेळाव्यात ते काश्मीरवर भाषण करतात, असा घणाघात आशिष शेलार यांनी उबाठा गटाचे प्रमुख उध्दव ठाकरेंवर केला. तसेच, त्यांचा कंठशोष होण्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी दहशतवाद्यांना कंठस्नान घातले, असा हल्लाबोल आशिष शेलार यांनी केला.

एखादा कार्यकर्ता आशीर्वाद मागायला जातो, तेव्हा तो आपल्या इष्ट देवतेच्या समोर उभा राहतो. आज मी माझ्या इष्ट देवतेसमोर उभा आहे, असे प्रतिपादन मुंबई पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार किरण शेलार यांनी केले. मुंबई पदवीधरची जागा ही भाजपाची आहे. ती आपण कुणाला तरी ठेवायला दिली होती. ती त्यांनी ढापली. आता ती पुन्हा मिळवायची आहे, असे आवाहनही किरण शेलार यांनी केले. दरम्यान, मुंबई ही कोणाची खासगी मालमत्ता नसून मुंबईकरांचीच आहे, हे स्पष्ट होईल असे सांगतानाच केवळ एका व्यक्तीला जिंकवण्यासाठी नाही, तर आपला गौरव मोठा करण्यासाठी, मुंबईला बदमाशांकडून वाचवण्यासाठी सर्वांना एकत्र येऊन प्रयत्न करायचे आहेत. तसेच, मुंबईसाठी ही निवडणूक खूप महत्त्वाची असून पायाभूत सुविधांपासून धोरणात्मक विकासापर्यंत प्रत्येक गोष्टीत आपल्याला काम करायचे आहे.

या मेळाव्यास विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषद गटनेते प्रवीण दरेकर, आमदार कालिदास कोळंबकर, अतुल भातखळकर, योगेश सागर, सुनील राणे, नितेश राणे, मनीषा चौधरी, मिहीर कोटेचा, पराग अळवणी, पराग शहा, भारती लव्हेकर, राजहंस सिंह, विद्या ठाकूर, तामिल सेल्वन, माजी खासदार गोपाळ शेट्टी, मनोज कोटक, ज्येष्ठ नेते राज पुरोहित, प्रकाश मेहता यांच्यासह भाजपाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■




















**मुंबई– प्रदेश बैठक– उपस्थिती–** राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे. या बैठकीत लोकसभा निवडणुकीत निवडून आलेल्या खासदारांचे स्वागतही करण्यात आले. प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माधवी नाईक, संजय केनेकर आदी यावेळी उपस्थित होते.

# धन्यवाद भारत...



लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतील पं. दीनदयाल उपाध्याय मार्गावरील विस्तारित भाजप मुख्यालयात देशवासियांना संबोधित केले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शाह उपस्थित होते.

**आजचा** विजय हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा विजय आहे. देशाच्या संविधानावर अतूट निष्ठा ठेवणाऱ्या मतदारांचा हा विजय आहे. 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राचा हा विजय आहे. विकसित भारताच्या उभारणीसाठी झटणाऱ्या सर्व भारतीयांचा हा विजय आहे. भारतीय जनता पार्टी, राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि देशभरातील सर्वच पक्षांच्या विजयी उमेदवारांचे मी अभिनंदन करतो. सर्वांच्या सहभागाशिवाय लोकशाहीचा हा विजय साकारला नसता. भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांचेही मी मनापासून आभार मानतो. १९६२ नंतर प्रथमच केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्ता येण्याची घटना प्रथमच घडली आहे. १० वर्षापूर्वी



देशाने सत्ता बदलासाठी कौल दिला होता. त्यावेळी मतदारांमध्ये प्रचंड निराशा होती. मोठ्या आशेने मतदारांनी आमच्याकडे सत्ता सोपविली. मतदारांच्या आशा, अपेक्षा पूर्ण करण्यासाठी गेल्या १० वर्षात आम्ही अविश्रांत मेहनत घेतली. २०१९ मध्ये मतदारांनी आमच्या प्रयत्नांवर विश्वास ठेवत आम्हाला पुन्हा जनादेश दिला. एनडीए सरकारचा दुसरा कार्यकाळ 'विकास आणि विरासत' यांची गॅरंटी बनला. या निवडणुकीत आम्ही जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यात गेलो. जनतेने एनडीएला सरकार बनवण्यासाठी तिसऱ्यांदा जनादेश दिला आहे. जनतेच्या या कौलापुढे मी नतमस्तक झालो आहे. हा जनादेश मी विनम्रतेने स्वीकारत आहे. आंध्र प्रदेशात एनडीएला सत्ता दिल्याबद्दल मी आंध्र प्रदेशाच्या जनतेचा आभारी आहे. ओडीशामधील जनतेने भारतीय जनता पार्टीला राज्यात सरकार बनवण्यासाठी जनादेश दिल्याबद्दल मी तेथील जनतेचेही आभार व्यक्त करतो. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशात शांततेत निवडणुका घेणे हे मोठे आव्हान असते. जवळपास १०० कोटी मतदार, ११ लाख मतदान केंद्रे, १.५ कोटी मतदान कर्मचारी, ५५ लाख मतदान यंत्रे (ईव्हीएम) यांच्या सहाय्याने निवडणूक आयोगाने अत्यंत कुशलतेने निवडणूक प्रक्रिया पार पाडली. जम्मू-काश्मीरच्या जनतेने या निवडणुकीत विक्रमी मतदान केले. मी जम्मू-काश्मीरच्या जनतेचे अभिनंदन करतो. काश्मीरच्या विषयावरून भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करणाऱ्या

## आव्हाने येणारच, मात्र ती पार करण्याचा विश्वास

**राष्ट्र प्रथम या भावनेने काम करताना अनेक आव्हाने येणारच. मात्र, त्या आव्हानांचा सामना करून ती पार करण्याचा विश्वास जनतेच्या जनाधारातून प्राप्त झाला आहे. ज्यांच्यासाठी स्वार्थ महत्त्वाचा आहे, अशा पक्षांच्या आघाडीस जनतेने पुन्हा सत्तेपासून दूर ठेवून आपला इरादा स्पष्ट केला आहे. या विजयाचे श्रेय भाजपचे कार्यकर्ते आणि रालोआ घटकपक्षांच्या परिश्रमांना आहे, असे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी सांगितले.**

शक्तींना काश्मीरच्या जनतेने विक्रमी मतदान करून चोख उत्तर दिले आहे.

सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन जेवढ्या जागा मिळाल्या त्यापेक्षा अधिक जागा एकट्या भारतीय जनता पार्टीला मिळाल्या आहेत. बिगर काँग्रेस सरकार प्रथमच सलग तीन वेळा केंद्राच्या सत्तेत येत आहे, ही साधी गोष्ट नाही. अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, ओडिशा या राज्यांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मोठा विजय मिळाला असून काँग्रेसचा सुपडा साफ झाला आहे. भारतीय जनता पार्टी ओडिशामध्ये सरकार स्थापन करत आहे. महाप्रभू जगन्नाथाच्या भूमीत भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री पहिल्यांदाच होत आहे. तेथील मतदारांचे मी मनापासून आभार मानतो. केरळमध्ये आपण प्रथमच खाते उघडले आहे. केरळमध्ये आपल्या कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांनी संघर्ष केला आहे. शेकडो कार्यकर्त्यांना केरळमध्ये बलिदान द्यावे लागले. या संघर्षाचे फळ अनेक वर्षांनी आपल्याला मिळाले आहे. तेलंगणमध्ये आपल्या खासदारांची संख्या दुप्पट झाली आहे. आंध्र प्रदेश आणि बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीने चांगले प्रदर्शन केले आहे. चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार या दोघांचे मी अभिनंदन करतो. अरुणाचल प्रदेश, आंध्र प्रदेश, ओडिशा या राज्यांच्या विकासात केंद्र सरकार कोणतीही कसर ठेवणार नाही, अशी ग्वाही मी देतो.

२०१४ मध्ये मतदारांनी सरकार बदलण्यासाठी जनादेश दिला. त्यावेळी मतदारांमध्ये कमालीची निराशा होती. भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आल्यामुळे सामान्य माणसाला सरकारबद्दल विश्वास वाटेनासे झाला होता. या निराशेच्या गर्तेतून बाहेर काढण्याची जबाबदारी मतदारांनी आपल्यावर सोपविली होती. ही जबाबदारी आम्ही प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला. आमची कामगिरी पाहूनच २०१९ मध्ये जनतेनी आम्हाला पुन्हा जनादेश दिला. आमचा सरकारचा दुसरा कार्यकाळ जनतेला दिलेले आश्वासने पूर्ण केल्यामुळे विकासाच्या गॅरंटीचा म्हणून प्रसिद्ध झाला. याच्या आधारावरच २०२४ च्या निवडणुकीत आम्ही मतदारांकडे आशीर्वाद मागण्यासाठी गेलो होतो. जनतेने आम्हाला तिसऱ्यांदा आशीर्वाद दिला आहे. याबद्दल मी जनतेपुढे अत्यंत विनम्र भावाने नतमस्तक होत आहे. त्यामुळेच आजचा क्षण माझ्या दृष्टीने अत्यंत भावपूर्ण आहे. आईच्या निधनानंतर झालेली ही पहिली निवडणूक होती, परंतु देशभरातील कोट्यवधी माता-भगिनींनी मला एवढे प्रेम दिले की, आईची अनुपस्थिती मला जाणवली नाही. यावेळच्या निवडणुकीत महिलांनी विक्रमी संख्येने मतदान केले. महिला मतदारांनी दिलेल्या स्नेहाबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन. गेल्या १० वर्षात आमच्या सरकारने जनकल्याणाचे अनेक निर्णय घेतले. १२ कोटी लोकांना नळातून पाणीपुरवठा, ४ कोटी गरिबांना पक्के घर, ८० कोटी गरजूंना मोफत अन्न-धान्य, कोट्यवधी नागरिकांना ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत देणारी आयुष्मान भारत योजना अशा अनेक योजना आमच्या सरकारने सुरू केल्या आहेत. आमच्या सरकारच्या निर्णयांमुळे आपली अर्थव्यवस्था जगातील पाचव्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनली. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेतून अर्थव्यवस्था आणखी वेगाने वाढत आहे. गेल्या १० वर्षात वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या दुपटीने तर एम्सची संख्या तिपटीने वाढली. आपला देश जगातील दुसऱ्या क्रमाकांचा मोबाईल उत्पादक देश बनला आहे. संरक्षण सामग्रीची, शस्त्रास्त्रांची आयात करणारा आपला देश आता संरक्षण उत्पादकांची निर्यात करू लागला आहे.

आमच्या सरकारने कोणत्याही परिस्थितीत भ्रष्टाचार सहन न करण्याची ठाम भूमिका घेतली. या पुढील काळातही भ्रष्टाचाराविरुद्ध अशीच कठोर भूमिका घेतली जाईल. डिजीटल इंडिया आणि तंत्रज्ञानाचा वापर करून आमच्या सरकारने भ्रष्टाचाराला आळा घातला आहे. आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी पक्षापेक्षा देश मोठा आहे. छत्रपती शिवाजी महाराज हीच तुम्हा-आम्हा सर्वांची प्रेरणा आहे. यापुढील काळातही आम्ही शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतूनच कार्यरत राहू. आमचे सरकार सर्व राज्य सरकारांना बरोबर घेऊन कारभार करेल. विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आम्ही अविश्रांत घेऊ. आपले अध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या नेतृत्वाखालील संघटनेने या निवडणुकीत प्रचंड कष्ट घेऊन बूथ पातळीपर्यत संघटना गतीमान ठेवली. देशासाठी समर्पण भाव ठेवत आपल्या कार्यकर्त्यांनी पक्षासाठी जीवापार मेहनत घेतली. त्यामुळे आपल्याला पुन्हा सरकार बनवण्याची संधी मिळाली आहे. या यशात आपल्या कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे. एनडीएच्या सर्व कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो आणि त्यांना धन्यवादही देतो. ■

# ऐतिहासिक विजय

**राष्ट्रीय** लोकशाही आघाडीला पूर्ण बहुमताने देशाची सत्ता दिल्याबद्दल मी जनतेचे आभार मानतो. या यशाबद्दल मी भाजपा आणि एनडीए कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात सरकारचे नेतृत्व करताना आघाडीवर राहून काम केले. देशासमोर काही संकट आले तर त्याचे निराकरण करण्यात पंतप्रधान मोदी यांनी स्वत: आघाडीवर राहून आपली जबाबदारी सांभाळली. त्यामुळेच कोट्यवधी मतदारांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर पुन्हा विश्वास व्यक्त केला आहे. गेल्या १० वर्षात मोदी सरकारने सुरू केलेल्या वेगवेगळ्या योजना, देशहितासाठी घेतलेले निर्णय यामुळेच मतदारांनी नरेंद्र मोदी यांना पुन्हा आशीर्वाद दिला आहे. सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी पंतप्रधान बनणे हा देशाच्या इतिहासातील अत्यंत महत्वपूर्ण क्षण आहे. काही नेते आणि पक्षांसाठी देशहितापेक्षा स्वत:चा स्वार्थ महत्वाचा असतो. या स्वार्थासाठी हे लोग काहीही करण्यास तयार असतात. ही मंडळी स्वार्थासाठी कोणाशीही आघाडी करतात. त्यांच्या दृष्टीने तत्व, विचारसरणी महत्वाची नसते. या निवडणुकीत काही पक्षांनी मतदारांना भरमसाठ आश्वासने देऊन मते मिळवण्याचा प्रयत्न केला. अशा पक्षांना जनतेने नाकारले आहे. एनडीएला केंद्रातील सत्ता पुन्हा देण्याचा जनादेश प्राप्त होत असताना ओडिशाच्या जनतेने तेथील राज्य सरकारची सत्ता भारतीय जनता पार्टीकडे सोपविली आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पूर्वांचलामध्ये भारतीय जनता पार्टीने सातत्याने चांगली कामगिरी नोंदविली आहे. अरुणाचल प्रदेशमध्येही आपला पक्ष सलग तिसऱ्यांदा सत्तेमध्ये आला आहे. ओडिशामध्ये ४० टक्के मते मिळवत ८० जागा जिंकण्याची कामगिरी आपल्या पक्षाने केली आहे. आंध्र प्रदेशमध्ये एनडीएचा घटक पक्ष असलेल्या तेलगू देशमने प्रचंड बहुमताने विधानसभा निवडणूक जिंकली आहे. केरळमध्ये अनेक वर्षांच्या संघर्षानंतर आपण लोकसभेची एक जागा जिंकली आहे. तामिळनाडूमध्ये आपल्या मतांची टक्केवारी वाढली आहे. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान बनले त्यावेळी देशापुढे आव्हानांचे डोंगर उभे होते. देशाच्या अर्थव्यवस्थेची आणि बँकिंग क्षेत्राची स्थिती अत्यंत नाजूक बनली होती. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने देशाची



अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आणि बँकिंग क्षेत्राला पुन्हा बळ देण्यासाठी निर्धाराने काम केले. त्यांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाल्याचे आपण अनुभवत आहोत. देशाची अर्थव्यवस्था आता जगात ५ व्या क्रमांकाची बनली आहे. सरकारी बँकांची स्थितीही चांगली सुधारली आहे. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात देशाची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकाची बनेल. नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब जनतेला ताकद दिली. ग्रामीण भागासाठी अनेक निर्णय घेत ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले. शेतकऱ्यांसाठीही अनेक योजना आखून शेतकऱ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले. वंचित, पीडितांना सक्षम करण्याचे कामही मोदी सरकारने गेल्या १० वर्षात प्रामुख्याने केले. विरोधी पक्षांनी गेल्या १० वर्षात नकारात्मक दृष्टीकोन ठेवत भारतीय जनता पार्टी सरकारपुढे सातत्याने अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांच्या नकारात्मक दृष्टीकोनामुळेच सलग तिसऱ्यांदा लोकसभा निवडणुकीत मतदारांनी विरोधकांच्या इंडि आघाडीला सत्तेत येऊ दिले नाही. लोकसभेच्या सलग तीन निवडणुकीत पराभव पत्करूनही विरोधी पक्षांची नकारात्मक दृष्टी कमी झालेली नाही. २०१४, २०१९ आणि आता २०२४ मध्ये जनतेने विरोधकांच्या आघाडीला बहुमतापासून लांबच ठेवले आहे. या निवडणुकीत विरोधी पक्षांनी खोट्या प्रचाराच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. कोणत्याही परिस्थितीत भारतीय जनता पार्टीला सत्तेतून हटवायचेच, असा निश्चय करून गोरगरीब जनतेला खोटेनाटे सांगून संभ्रमित केले गेले. खोटे व्हीडिओ प्रसारीत केले गेले. एवढे करूनही मतदारांनी एनडीए सरकारलाच सत्ता दिली आहे.

**(राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी केंद्रीय कार्यालयात ४ जून विजयोत्सवप्रसंगी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.)**

# मोदी सरकार @३
# प्रदेश कार्यालयात जल्लोष



**जल्लोष– उपस्थिती–** प्रदेश उपाध्यक्ष आ. संजय कुटे, प्रदेश समन्वयक विश्वास पाठक, ज्येष्ठ नेते मधु चव्हाण, माजी आमदार राज पुरोहित, माजी आमदार अतुल शाह, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत आदी.








# मोदी हे सर्वसमावेशक नेते

● **प्रकाश जावडेकर**, माजी केंद्रीय मंत्री

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक २४० जागा मिळवूनही बहुमतापासून दूर असल्यामुळे भाजपला आघाडी सरकारचा पर्याय स्वीकारावा लागला. त्यानिमित्ताने 'मोदींना असे सरकार चालवण्याची सवय नाही' अशी चर्चा सुरू झाली. सत्तेच्या प्रमुख पदावर सलग २३ वर्षे राहिले आहेत असे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकशाही जगातील एकमेव नेते आहेत. आघाडी सरकारचा कारभार ते समन्वयाने चालवतील.

**ते** १३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि त्यानंतर गेली १० वर्षे भारताचे पंतप्रधान आहेत. आता त्यांची पुढील पाच वर्षांसाठी पंतप्रधान म्हणून निवड झाली आहे. एका अर्थाने हा त्यांच्या लोकप्रियतेवर जनतेच्या पसंतीचा शिक्का आहे. दहा वर्षे पंतप्रधान राहूनही, त्यांची लोकप्रियता निरंतर टिकून आहे. लोकांनी या निवडणुकीत पंतप्रधान म्हणून मोदी यांनाच पसंत केले आहे, हे सत्य आहे. अनेकांचा असा गैरसमज झाला आहे की पंतप्रधान मोदींना पहिल्यांदाच संयुक्त सरकार चालवावे लागणार आहे, पण ते खरे नाही. २०१४ आणि २०१९ ही दोन्ही सरकारे एनडीएचीच होती. त्यातही घटक पक्षांचे खासदार मंत्री होते आणि दर अधिवेशनापूर्वी एनडीएची संयुक्त बैठक व्हायची.

नरेंद्र मोदी यांचे गुजरातचे १३ वर्षांचे शासन म्हणजे सर्वांना विश्वासात घेऊन एका राज्याला प्रगतीच्या नव्या टप्प्यावर नेऊन ठेवण्याचा कालखंड होता. या काळात पूर, भूकंप आणि अनेक नैसर्गिक संकटे आली. त्याचबरोबर दंग्यामुळे परिस्थिती बिघडली होती, पण त्यांनी कायदा



नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू या दोघांशीही पंतप्रधान मोदी उत्तम पद्धतीने समन्वय ठेवतील.

सुव्यवस्था आणि त्याचबरोबर सर्व समुदायांमध्ये एक विश्वासाचे वातावरण तयार केले आणि म्हणून गेल्या १२ वर्षांत तिथे एकही दंगल झाली नाही.


मुख्यमंत्री म्हणून आणि पंतप्रधान म्हणून त्यांनी केलेल्या कामाचा उल्लेख असणारे 'मोदी २०' हे पुस्तक फार महत्त्वाचे आहे. कारण त्यामध्ये विविध क्षेत्रातील २० मान्यवर व्यक्तींनी लेख लिहिले आहेत, आपले अनुभव सांगितले आहेत. या पुस्तकातून मोदींचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन दिसतोच आणि त्याचबरोबर आवश्यक त्या सर्वांना बरोबर घेऊन प्रश्नाची सोडवणूक कशी करायची याचे दर्शन घडते. एका अर्थाने हे 'गुड गव्हर्नन्स' चे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते की मोदींची दृष्टी केवळ पक्षीय किंवा संकुचित नाही तर विकासासाठी पूरक अशा सर्वांचा सहयोग घेण्याचीच आहे. मला वाटते की हीच त्यांच्या पुढील दहा वर्षांच्या एनडीए सरकारच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

ते जेव्हा कुणालाही भेटतात तेव्हा ते पूर्ण वेळ लक्ष देऊन बोलणाऱ्याचे म्हणणे ऐकतात, त्यातला मुद्दा समजून घेतात. त्यासंदर्भात अधिक माहिती हवी असेल तर तेवढी विचारतात. जो कोणी त्यांना भेटतो तो त्यांच्यामुळे प्रभावित होऊन जातो. कारण जिथे दहा मिनिटे वेळ दिलेला असतो, तिथे अर्धा तास सहज जातो. ते अवांतर गप्पा मारत नाहीत. तुमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतात. मोदी 'गुड लिसनर' आहेत.

ते सर्वांबरोबर काम करू शकतात आणि ते कसे सर्वांबरोबर काम करतात ते मी दहा वर्षे प्रत्यक्ष पाहिलेले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोणाही मंत्र्याला ठेवलेल्या विषयावर वेगळे मत असल्यास मांडण्याचा पूर्ण अधिकार असायचा. ते शांतपणे ऐकून घ्यायचे आणि त्या म्हणण्यामध्ये दम आहे असे वाटले तर अधिकाऱ्यांना सांगायचे की हा विषय आज पुढे ढकलू या आणि यानंतर पुन्हा एकदा नीट विचार करून, जे मुद्दे उपस्थित झाले त्यांचा परामर्श घेऊन मग पुन्हा मंत्रिमंडळात ठेवा. ते कुणालाही बोलू देत नाहीत असा गैरसमज असू शकतो. पण मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीत रामविलास पासवान तसेच भाजपाचे इतर मंत्रीही आपापले मत मांडायचे. आणि हेच यापुढेही सुरू राहील.

मोदीजींसाठी राजकारण हे २४ तास करायचे व्रत आहे. त्यांचा तो व्यवसाय नाही किंवा त्यांचा तो नुसता छंद नाही. देशाचे काही भले करण्यासाठी आपल्याला मिळालेली ही संधी पुरेपूर वापरायची आहे, हे त्यांच्या सतत मनात असते आणि सहकाऱ्यांच्या मनावरही ते सतत हेच बिंबवत असतात. त्यामुळे २०२४ ते २०२९ या पाच वर्षांच्या काळात हे सरकार उत्तम पद्धतीने चालेल याविषयी मला कोणतीही शंका नाही.

मोदींना राजकारणाची जबरदस्त समज आहे. सगळे छोटे–मोठे प्रवाह ते टिपत असतात. त्यांच्याकडे नेमकी, महत्त्वाची अशी माहिती सतत येत असते. त्यांची जबरदस्त स्मरणशक्ती त्यांना खूप उपयोगी पडते. ते लगेच संबंधित माणसांशी बोलून परिस्थिती समजावून घेतात. त्याच्यावर काय उपाय करता येईल याबाबत दहा ठिकाणांहून वेगवेगळी माहिती घेतात आणि त्या माहितीच्या आधारावर



> २०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीला स्वबळावर बहुमत मिळाले होते. तरीही भारतीय जनता पार्टीने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचेच (एनडीए) सरकार बनवले. २०१९ मध्ये ३०० पेक्षा अधिक जागा मिळवल्यावरही भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने भाजपा सरकारऐवजी एनडीए सरकारच बनवले. राज्यसभेचे उपाध्यक्षपद संयुक्त जनता दलाच्या हरिवंश नारायण सिंह यांना दिले. सर्व घटक पक्षांना बरोबर घेतच मोदी सरकारचा कारभार चालू आहे. त्यामुळे आता आघाडी सरकार चालविताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास आहे.

ठाम निर्णय घेतात. पण त्यावर कोणाला चर्चा करायची असेल तर त्याला ते कधीही नाही म्हणत नाहीत. शेवटी संयुक्त सरकार चालवताना त्यामध्ये घटक पक्षांचा संवाद महत्त्वाचा असतो आणि तो ते निश्चितपणाने पार पाडतील याची मला खात्री आहे, कारण मला तसा अनुभवही आहे.

मोदींचा आणखी एक विशेष आहे. ते केवळ सरकारमधीलच नव्हे, केवळ एनडीएच्याच नव्हे तर सर्व खासदार, सर्व मुख्यमंत्री यांनाही तितक्याच आदराने वागवतात. मनमोहन सिंग, देवेगौडा आणि अन्य ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचे वागणे मी जवळून पाहिले आहे. केवळ भाजपच्याच नव्हे, तर अन्य पक्षांच्या आमदार व मुख्यमंत्री यांच्याही व्यक्तिगत सुखदु:खामध्ये ते सामील होतात, स्वत:हून चौकशी करतात. अधूनमधून संपर्क करतात. शिवसेना २०१९ नंतर मोदींच्या सरकारमधून बाहेर पडली त्या वेळेला अरविंद सावंत हे मंत्री होते. त्यानंतरही नेहमी मोदी त्यांची आस्थेने चौकशी करायचे. अशीच चौकशी आणि संबंध त्यांनी अकाली दल बाहेर पडल्यावरही त्यांच्याशीही ठेवले. मला वाटते घटक पक्षांबरोबर सरकार चालवण्याचाच हा परिणाम आहे.

अटलजींनी सहा वर्षे घटक पक्षांबरोबर एनडीए सरकार चालवले. त्याच परंपरेत मोदी गेली दहा वर्षे सरकार चालवत आहेत आणि याही पुढे चालवत राहतील याची खात्री बाळगावी. कोणी अवाजवी मागणी केली तर ते आपले मत स्पष्ट सांगतात, पण ते खासगी बैठकीत. मला तरी या सरकारच्या भविष्याविषयी तसेच स्थैर्याविषयी जराही शंका वाटत नाही.

जेडीयू, तेलगू देशम या पक्षांच्या सहभागामुळे लोकांच्या मनात ही शंका आली. पण हे दोन्ही पक्ष गेल्या दहा वर्षांत काही काळ एनडीए सरकारचा भाग होते. तेलगू देशम २०१८ पर्यंत सरकारचा भाग होते आणि जेडीयू २०१६ पर्यंत आणि पुन्हा २०२२ पासून सरकारमध्ये आहेच. त्यामुळे २०२४ साली काही तरी वेगळेच घडले आहे आणि आता मोदी हे सरकार कसे चालवतील असा प्रश्न उपस्थित होण्याचे काही कारणच नाही.

निकालानंतर झालेल्या एनडीएच्या बैठकीमध्ये त्यांनी एकदाही भाजप सरकार असे म्हटले नाही. त्यांनी एनडीए सरकार असाच उल्लेख सातत्याने केला. सर्व पक्षाच्या नेत्यांनी उत्स्फूर्तपणे मोदीजींचे स्वागत केले आणि त्यांच्या नावाला पाठिंबा दिला. त्यांची सगळ्यांची भाषणेही हे सरकार दीर्घकाळ चालेल याची ग्वाही देणारी होती. ■



# हा कौल मोदींच्या नेतृत्वालाच

● खा. राकेश सिन्हा

> २०१९ च्या निवडणुकीपेक्षा भारतीय जनता पार्टीचे लोकसभेतील संख्याबळ कमी झाल्यामुळे अनेकांना आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत. या निवडणुकीत मतदारांनी भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा पराभवच केला आहे, अशा थाटात काही विरोधक मंडळी नाचू लागली आहेत. संसदीय लोकशाहीत खासदारांच्या संख्येला मोठे महत्व असते.

एखाद्या पक्षाची ताकद वाढली की कमी झाली हे ठरवण्यासाठी त्या पक्षाच्या लोकसभेत निवडून आलेल्या खासदारांची संख्या हाच निकष लावला जातो. त्यामुळे विरोधक मंडळी, काही विश्लेषक, पत्रकार भाजपाची पीछेहाट झाली, असा निष्कर्ष काढून मोकळे झाले आहेत. या मंडळींना मला एक गोष्ट आवर्जुन सांगायची आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व, त्यांची विकासाची दृष्टी ही निवडणुकीच्या निकाला पलिकडची आहे.

भारतासारख्या देशात लोकसभा निवडणूक अनेक गोष्टींवर अवलंबून असते. सामाजिक, प्रादेशिक, स्थानिक असे अनेक घटक लोकसभा निवडणुकीच्या निकालावर परिणाम करणारे असतात. भारतीय जनता पार्टीने या घटकांना नेहमीच स्वीकारले आहे. त्यामुळे २०१४ आणि २०१९ अशा दोन्ही वेळेस स्वबळावर बहुमत मिळूनही केंद्रातील सरकार 'एनडीए'चे आहे, असे भाजपा नेतृत्वाने नेहमीच सांगितले आहे. २०२४ च्या निवडणुकीत मतदारांनी

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) केंद्रातील सत्तेसाठी सलग तिसऱ्यांदा कौल दिला आहे. भारतीय जनता पार्टीची मते २०१९ च्या मतांची तुलना करता जवळपास तशीच राहिली आहे. तरीही भारतीय जनता पार्टीला २७२ म्हणजे बहुमताच्या आकड्याएवढ्या जागा मिळू शकल्या नाहीत. काही राज्यांत भारतीय जनता पार्टीला अपेक्षा एवढ्या जागा मिळाल्या नाहीत, हे वास्तव नाकारून चालणार नाही. मात्र ज्या राज्यांमध्ये आजवर भाजपाचे नाममात्र अस्तित्व होते त्या राज्यात भारतीय जनता पार्टीची मते मोठ्या प्रमाणात वाढली आहेत.

नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी भारतीय जनता पार्टीने मते मागितली होती. केरळ, तामिळनाडू, ओडिशा, तेलंगण या राज्यांमधील भाजपाची मते मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. याचा अर्थ मतदारांनी नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारले आहे, असाच होतो. तेलंगणमध्ये २०१९ च्या निवडणुकीत भाजपाला १९.४५ टक्के मते होती. ही मते यावेळच्या निवडणुकीत ३५ टक्क्यांवर गेली आहेत. तामिळनाडूतील मतांची टक्केवारी ३ टक्क्यांवरून १० वर गेली आहे. केरळमध्ये १६ टक्के मते मिळवताना भाजपाने एक जागा ही जिंकली आहे.

उत्तर भारताबरोबरच दक्षिण भारतातही भारतीय जनता पार्टी आपला पाया विस्तारत आहे, असे चित्र या निवडणुकीतून स्पष्टपणे दिसले आहे. पश्चिम बंगालमध्ये अपेक्षित यश मिळाले नसले तरी भाजपाची मतांची टक्केवारी लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. भारतीय जनता पार्टी हा विचारसरणीच्या आधारावर चालणारा पक्ष आहे. ज्या राज्यांमध्ये पूर्वी आमचे अस्तित्वही नव्हते, अशा राज्यांमध्ये आमची मतांची टक्केवारी गेल्या १० वर्षात सातत्याने वाढत आहे, याचा अर्थ आमच्या विचारसरणीला, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला मतदारांनी स्वीकारले आहे. ओडिशा या पूर्वेकडील राज्यात भाजपाने विधानसभेत स्वबळावर बहुमत मिळवले आहे. त्यामुळे ही निवडणूक आम्हाला धक्का देणारी अजिबात नव्हती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व भविष्यवेधी आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णायांची समिक्षा निवडणूक निकालाच्या आकडेवारीने होऊ शकत नाही. नरेंद्र मोदी यांनी विकासाचा धडक कार्यक्रम राबवताना देशाचा सांस्कृतिक वारसाही अभिमानाने जगासमोर आणला. पाश्चिमात्य विचारसरणी श्रेष्ठ मानणाऱ्या देशातील अनेक विचारवंतांना भारताला प्राचीन अभिमानास्पद सांस्कृतिक वारसा आहे, हे स्वीकारणे कठीण जाते. त्यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृती दुय्यम दर्जाची आहे. मात्र नरेंद्र मोदी यांनी अभिमानास्पद भारतीय संस्कृती जगभर दौरे करताना प्रकर्षाने जगासमोर ठेवली. भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगताना नरेंद्र मोदी यांनी अपराधगंड कधीच बाळगला नाही. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि त्याआधी मोगल शासकांशी लढा देणाऱ्या अनेक दुर्लक्षित वीरांचे वारंवार स्मरण करत पंतप्रधान मोदी यांनी आपले वेगळेपण दाखवून दिले.

बिरसा मुंडा तसेच गुरु गोविंद सिंग यांच्या जोरावर सिंग आणि फतेह सिंग या कोवळ्या वयातील मुलांनी देशासाठी दिलेल्या बलिदानाचा नरेंद्र मोदी यांनी यथोचित गौरव केला. योग साधनेला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. मोदी यांच्या १० वर्षातील कार्यकाळातील अनेक निर्णयांचे वेगळेपण अनेक दृष्टीने महत्वाचे आहे. या निवडणुकीने आमच्या संघटनेला आणि लोकप्रतिनिधींनाही काही धडे दिले आहेत. खासदारांनी फक्त पंतप्रधान मोदी यांच्या लोकप्रियतेवर अवलंबून न राहता सातत्याने जनसंपर्क ठेवला पाहिजे. विविध मार्गांनी लोकांच्या संपर्कात राहिले पाहिजे.

२०१९ च्या निवडणुकीनंतर झालेल्या खासदारांच्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी सांगितले होते की, योग शिबिरे, क्रीडा स्पर्धा यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून तुम्ही जनतेच्या संपर्कात असले पाहिजे. मतदार नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला मत देतातच, पण उमेदवार कोण आहे, कसा आहे, तो आपल्याशी कसा वागतो या घटकांचाही मतदार विचार करतात, हे अनेकदा दिसून आले आहे. मोदी सरकार हे आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपला ठसा उमटवू लागल्याने अनेक आंतरराष्ट्रीय शक्ती भारतीय जनता पार्टीचा पराभव व्हावा, यासाठी कार्यरत होत्या.

काही विदेशी शक्तींना मोदी सरकारची लांगुलचालन न करण्याची धोरणे पसंत नव्हती. त्यांनीही विविध मार्गांनी भारतीय जनता पार्टीला पराभूत करण्याचे प्रयत्न केले. मात्र हे प्रयत्न भारतीय मतदारांनी यशस्वी होऊ दिले नाहीत. मतदारांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला स्वीकारले आहे, हेच सत्य आहे.

**(लेखक हे राज्यसभा सदस्य आहेत.)**

# निराश होण्याचे कारण नाही, विजय आपलाच आहे

● **माधव भांडारी**, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> मी समाज माध्यमांवर तसा फारसा सक्रिय नसतो, पण आज महाराष्ट्र भारतीय जनता पक्षातील सर्वात जुन्या व अनुभवी कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून काही गोष्टी मला लिहाव्याशा वाटल्या म्हणून हे लिहित आहे. लोकसभा निवडणुकीचे महाराष्ट्रातील निकाल हे आपल्या सगळ्यांसाठी अनपेक्षित होते.



**आपल्या** कार्यकर्त्यांमध्ये आणि हितचिंतकांमध्ये स्वाभाविकच दु:खाची भावना आहे. उलट सुलट चर्चा आणि अफवांना पेव फुटलेलं आहे. पण या परिस्थितीमुळे कार्यकर्त्यांनी खचून जाऊन चालणार नाही. आपल्यातल्या अनेकांना १९८४ आणि २००४ च्या घटना लक्षात असतील. पण त्या दोन्ही वेळेला आपण भारतासाठी, महाराष्ट्रासाठी झटत राहिलो आणि अपेक्षेपलीकडे नवीन सामर्थ्याने उभे राहिलो. ह्या वेळेला तर विरोधकांना आणि आपल्याला मिळालेली मते सारखी आहेत. त्यामुळे ही लढाई पूर्वीइतकी अवघड नाही. यावेळचे स्थित्यंतर खरंतर एक खडतर परीक्षा आहे. या परीक्षेतून तावून सुलाखून पुन्हा उभे राहण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. असे अनेक अनुभव पचवत पचवतच आपण इथपर्यंत आलो आहोत. पक्षातील कार्यकर्त्यांच्या नवीन पिढीसाठी हा एक अत्यंत महत्वाचा क्षण आहे, राजकारण आणि समाजकारण यांचे वेगवेगळे कंगोरे समजून घेण्याची ही संधी आहे. मी १९८० पासून भारतीय जनता पार्टीचे काम करतोय. माझ्यासारख्या अनेकांनी हार–जीतीसाठी नाही तर केवळ विकास आणि भारतीय राष्ट्रवादासाठी आपली आयुष्य पणाला लावली आहेत.

आता जरा निकालाच्या आकडेवारीकडे वळू. आपल्याला फार मोठा धक्का दिल्याचा आव विरोधकांनी आणि प्रसारमाध्यमांनी आणला आहे. निकालाच्या आकडेवारीवर नजर टाकल्यावर १३३ विधानसभा मतदारसंघात आपण आघाडीवर आहोत. २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकीत अनुक्रमे ४२ आणि ४१ जागा मिळवताना आपण २२० ते २३० विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळवली होती. २०१४ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीची सत्ता केंद्रात आणि राज्यातही होती. तरीही आपण ४२ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसच्या इतिहासातील तो सर्वात दारूण पराभव होता. आपली थोडी पीछेहाट झाली आहे. तरीही १३३ विधानसभा मतदारसंघात आपल्याला आघाडी आहे. १९८० आणि १९८४ या दोन्ही निवडणुकांत आपली स्थिती किती वाईट होती हे आताच्या पिढीतील कार्यकर्त्यांना ठाऊक नाही. त्याही स्थितीत आपण टिकून राहिलो, एवढेच नव्हे तर हळूहळू वाढत राहिलो. १९८५ मध्ये आपले फक्त १४ आमदार निवडून आले होते. अवघ्या १० वर्षात आपण




संघटना हेच आपले बलस्थान आहे. संघटना म्हणून आपण कोठे कमी पडलो, याचा विचार योग्य पातळीवर होईलच.


शिवसेनेच्या साथीत सत्तेत आलो. हा इतिहास सांगण्याचे कारण आपल्यापैकी अनेकांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालात फारच भयंकर वगैरे घडल आहे, असा समज करून घेतला आहे. धार्मिक ध्रुवीकरण, काही समाजघटकांकडून जातीच्या आधारे झालेला विरोध, संविधान बदलाची हाकाटी अशा अनेक प्रतिकूल गोष्टीतही आपण १३३ विधानसभा मतदारसंघात आघाडी घेतली आहे. जनसंघापासून संघटना हेच आपले बलस्थान आहे. या निवडणुकीत आपण संघटना म्हणून कोठे कमी पडलो, याचा विचार योग्य पातळीवर होईलच. अशा अनेक धक्क्यातून ठेचकाळत आपण समर्थपणे उभे राहिलो आहोत. समाजवादी, साम्यवादी या विचारधारांची आजची अवस्था पहा. देशावर ६० हून अधिक वर्षे सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेसला सलग तीन निवडणुकीत तीन आकडी जागा मिळवता आलेल्या नाहीत. याचं कारण काँग्रेस, समाजवादी आणि साम्यवादी प्रवाहातील राजकीय पक्षांनी संघटनेच्या बांधणीला काळाच्या ओघात कमी लेखणे सुरू केले. १९५१ मध्ये जनसंघाची स्थापना होताना ज्या विचारसरणीच्या आधारावर आपण वाटचाल सुरू केली. ते मुद्दे अनेक वर्षांच्या संघर्षातही आपण सोडून दिले नाहीत. प्रखर राष्ट्रवादाच्या पायावर उभी असलेली विचारधारा आणि समर्पित कार्यकर्त्यांचे मोहोळ या शिदोरीवर आपण अथक संघर्ष करत १९९८ ते २००४ अशी सहा वर्षे आणि त्यानंतर २०१४ पासून देशाची सत्ता मिळवली आहे. सध्याच्या पिढीतील तरुण कार्यकर्त्यांनी पक्षाच्या संघर्षपूर्ण वाटचालीचे कधीच विस्मरण होऊ देऊ नये. अन्य पक्षातील आणि आपल्यातील वेगळेपण आपली विचारधारा आणि त्यागी कार्यकर्त्यांची फौज यातच दडले आहे. मतदार आपल्यापासून दुरावलेला नाही, हे कायम लक्षात ठेवा. प्रसारमाध्यमे आणि विरोधक कितीही बढाया मारत असले तरी त्यांचा विजय झालेला नाही, हे प्रथम मनाला समजावून सांगा. समाजमाध्यमांचा वापर करून आपल्या कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची करण्याचे प्रयत्न जोमाने सुरू आहेत. या प्रयत्नांना हाणून पाडण्यासाठी आपला स्वत:वर विश्वास असणे आवश्यक आहे. याही स्थितीतून आपण वेळेत बाहेर पडू, असा विश्वास प्रत्येकाने स्वत:ला दिला पाहिजे. विधानसभा निवडणुकीत आपण जिंकायचेच असा निर्धार करून प्रत्येक कार्यकर्त्याने त्या दृष्टीने तयारीला लागले पाहिजे. ही लढाई दीर्घकाळ चालणारी आहे. ती तात्कालिक जय-पराजय, व्यक्तिगत भावना, हेवेदावे, न्याय-अन्याय यांच्या पलीकडची आहे. लढणं हे माझं काम आहे, आपल्या सगळ्यांचं काम आहे, आणि ते मी स्वत: पेटून उठून करणार आहे. माझ्या सर्व प्रकारच्या कारकिर्दीच्या ह्या अखेरच्या टप्प्यावर मी अजून निर्धाराने व संपूर्ण सामर्थ्याने पक्षासाठी, पक्षाच्या नेतृत्वासाठी आणि कार्यकर्त्यांसाठी उभा राहणार आहे. येणारे चार महिने महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. ऑक्टोबर २०२४ मधली निवडणूक भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय लोकशाही आघाडीने पूर्ण ताकतीने लढणं आणि जिंकणं हे २१ व्या शतकातल्या महाराष्ट्रासाठी नितांत आवश्यक आहे. त्यामुळे माझी महाराष्ट्रातील सर्व भाजपा कार्यकर्त्यांना विनंती आहे की, आत्मविश्वास बाळगू, संयम ठेवू. वायफळ चर्चा आणि अफवा यांच्यात न गुंतता नवीन विश्वासाने आपल्याला महाराष्ट्रासाठी झटायचे आहे.

मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतामध्ये आणि मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात पक्ष खंबीरपणे उभा राहणार आहे. स्व. अटलजींच्या शब्दांचा आधार घेऊन मी शेवटी एकच खात्री देईन अंधेरा हटेगा, कमल खिलेगा.

**(श्री. भांडारी यांची 'एक्स'वरील पोस्ट)**


# बाधाये आती है आएँ...

यावेळची लोकसभा निवडणूक अनेक अर्थानी वैशिष्ट्यपूर्ण ठरली. मतदारांनी दिलेल्या कौलाचा आपआपल्या परीने अर्थ, अन्वयार्थ लावण्याची घाई सुरू झाली आहे. महाराष्ट्रातल्या काही मंडळींनी या निकालाच्या आधारे भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मतदारांनी नाकारले असल्याचा डंका पिटणे सुरू केले आहे. केशवसुत म्हणतात, जग केवढं, ज्याच्या त्याच्या डोक्याएवढं., त्याप्रमाणे या मंडळींच्या गर्जनांकडे लक्ष देण्याचे कारण नाही.



**९ जागा** जिंकलेल्या मंडळींनी ९०० जागा मिळाल्यासारखा जल्लोष चालू केला आहे. या निकालाचा अनेक बाजूंनी आणि मुख्यत: आकडेवारीच्या आधारे अभ्यास केल्यावर मतदारांनी भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट जनादेश दिला आहे, असे म्हणावे लागते. अनेक विरोधी पक्षांची एकत्रित आघाडी, संविधान बदलाची हाकाटी, धार्मिक आधारावर निघालेले फतवे या पार्श्वभूमीवर ही भारतीय जनता पार्टीने २४० जागा जिंकल्या आहेत. आता या निकालांचा पूर्वीच्या निवडणुकीच्या निकालांच्या आधारे विचार केल्यावर कोण जिंकलं आणि कोण हरलं हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट होईल. २०१४ च्या निवडणुकीत त्यावेळच्या सत्ताधारी काँग्रेसला अवघ्या ४२ जागा मिळाल्या. २००९ मध्ये काँग्रेसच्या मतांची टक्केवारी होती २८.५५ तर भाजपाची टक्केवारी होती १८.८०. २०१४ मध्ये काँग्रेसच्या वाट्याला १९.३१ टक्के मते मिळाली तर भाजपाची टक्केवारी ३१ टक्क्यांवर पोहोचली. काँग्रेसची टक्केवारी २०१४ मध्ये ९ टक्क्यांनी घसरली. २००९ च्या निवडणुकीत २०६ जागा मिळवणाऱ्या काँग्रेसला १५० हून अधिक जागा गमवाव्या लागल्या. मतदारांनी काँग्रेसला सरळ-सरळ नाकारला, हे जागा आणि मतांची टक्केवारी या दोन्हीतून सिद्ध झाले. २०१९ मध्ये भारतीय जनता पार्टीची मते ३१ टक्क्यावरून थेट ६ टक्क्यानी वाढून ३७.७ टक्के एवढी झाली. काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारीत मात्र अवघी पाव टक्क्यांची वाढ झाली. २०१४ मध्ये १९.३१ टक्के मते मिळवणाऱ्या काँग्रेसची २०१९ मधील टक्केवारी १९.६७ एवढीच वाढली. यावेळच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीची मते अर्ध्या टक्क्यांनी घटली. (३६.५६टक्के). मात्र भाजपाच्या जागा मात्र ६३ ने कमी होऊन ३०३ वरून २४० वर आल्या. काँग्रेसची टक्केवारी पावणे दोन टक्क्याने वाढूनही जागा ४६ ने वाढून ९८ पर्यंत गेल्या. मतदानाच हे आकडेवारीतील गणित चक्रावून टाकणारे असते. सर्व विरोधी पक्ष एकत्रित येऊनसुद्धा २०१९ च्या तुलनेत भारतीय जनता पार्टीची

> १९८४ मध्ये आपला पक्ष पहिल्या लोकसभा निवडणुकीला सामोरा गेला. त्यावेळी आपण 'प्रधानमंत्री की अगली बारी अटल बिहारी' अशा घोषणा द्यायचो. इंदिरा गांधी यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लोकसभा निवडणुकीत आपल्याला अवघ्या दोन जागा मिळाल्या. त्यावेळी आपली यथेच्छ टिंगलटवाळी झाली. पण आपण खचलो नाही. १९९८ मध्ये अटलजी पंतप्रधान झालेच.



मते अर्ध्या टक्क्यांनीच कमी झाली आहेत. तरीही ९ जागा मिळवणारी कार्यकारी संपादक मंडळी भारतीय जनता पार्टीला मतदारांनी नाकारले आहे, असे घसा खरवडून सांगत आहेत. मतदारांनी नाकारणं म्हणजे काय, हे १९७७, १९८०, १९८९, २०१४ च्या निवडणुकीत दिसले आहे. १९८४ मध्ये काँग्रेसने ४१५ जागा जिंकल्या होत्या. १९८९ मध्ये काँग्रेसच्या जागा तब्बल २२० नी कमी झाल्या आणि त्या १९५ वर आल्या. २०२४ मध्ये भारतीय जनता पार्टीची मतांची टक्केवारी फक्त अर्ध्या टक्क्यांनी घसरूनही जागा मात्र ६३ नी कमी झाल्या आहेत. एकूण मते आणि मिळालेल्या जागा याच्या आधारेच निवडणुकीतील यशाचे मूल्यमापन करावे लागते. १९७७ मध्ये आणिबाणीच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि त्यांचे पुत्र संजय गांधी या दोघांनाही पराभूत केले. १९७१ मध्ये 'गरीबी हटाओ'चा नारा देत इंदिरा गांधींनी ३०० पेक्षा अधिक जागा मिळवून दणदणीत यश मिळवले होते. १९७७ मध्ये काँग्रेसच्या जागा २०० नी कमी झाल्या. याला म्हणतात मतदारांनी नाकारणे किंवा पराभूत करणे.

२०२४ च्या निवडणुकीत खोट्या बातम्या पसरवून मतदारांना संभ्रमित करून देशात अस्थिरता निर्माण करण्याचे षड्यंत्र रचले गेले होते. गेल्या १० वर्षात केलेली विकासाची अनेक कामे जनतेसमोर मांडत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी निवडणुकीला सामोरे जात होते. नरेंद्र मोदींच्या विकासाच्या हमीसमोर आपला टिकाव लागणार नाही, हे लक्षात आल्याने पुन्हा भाजपा सत्तेवर आल्यास संविधान बदलले जाणार, असा प्रचार काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील सर्व पक्षांनी सुरू केला. अशा प्रचारामुळे जनता प्रक्षुब्ध होऊन समाजात दुही, असंतोष माजावा याच हेतूने या अपप्रचाराला गती दिली गेली. त्याच्या बरोबरीने धार्मिक आधारावर काही समाज घटकांना भरघोस आश्वासने दिली गेली. धार्मिक आधारावर मतदारांचे ध्रुवीकरण करण्यासाठी अल्पसंख्याक समाजाच्या मनात भयगंड निर्माण केला गेला. त्याचा परिणाम भारतीय जनता पार्टीविरोधात अनेक ठिकाणी एक गठ्ठा मतदान होण्यात झाला. सीएए कायद्यामुळे मुस्लिम धर्मियांना देशातून बाहेर काढले जाणार, असा प्रचार करून मुस्लिमांच्या मनात भाजपा आणि मोदी सरकारबद्दल भीती निर्माण केली गेली. धार्मिक आधारावर किती जोमाने ध्रुवीकरण झाले, हे मुस्लिम बहुल असलेल्या दोन विधानसभा मतदारसंघातील मतदानाच्या आकडेवारीवरून स्पष्टपणे दिसते. धुळे मतदारसंघातील मालेगाव (मध्य) या विधानसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवार डॉ. शोभा बच्छाव यांना १ लाख ९८ हजार ८६९ मते मिळाली तर भाजपा उमेवार डॉ. सुभाष भामरे यांना अवघी ४ हजार ५४२ मते मिळाली. केवळ या मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराला १ लाख ९४ हजाराचे प्रचंड मताधिक्य

मिळाले. धुळे शहर, धुळे ग्रामीण, शिंदखेडा, मालेगाव बाह्य, सटाणा-बागलाण या ५ विधानसभा मतदारसंघात १ लाख ८८ हजारांहूनही अधिक मताधिक्य मिळवणाऱ्या भाजपाच्या डॉ. भामरे यांना केवळ एका मतदारसंघातील पिछाडीमुळे अवघ्या ३ हजार मतांनी पराभव पत्करावा लागला. महाराष्ट्रात ८ मतदारसंघात ३० हजारापेक्षा कमी मतांनी भाजपा उमेदवार पराभूत झाले आहेत.

राज्यात महायुतीला मतदारांनी नाकारले असे रंगविले जाणारे चित्र चुकीचे असून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या मतांमध्ये फक्त २ लाखांचे अंतर आहे. महायुतीला ४३.६० टक्के तर महाविकास आघाडीला ४३.९१ टक्के मते मिळाली आहेत. महाविकास आघाडीला २ कोटी ५० लाख तर महायुतीला २ कोटी ४८ लाख मते मिळाली आहेत. अर्ध्या टक्क्यांपेक्षाही कमी मतांचा फरक असूनही महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा अधिक जागा मिळाल्या आहेत. २०१९ च्या निकालाच्या तुलनेत भाजपाची मते दीड टक्क्यांनी कमी झाली. मात्र काँग्रेसची मते एक टक्क्याने वाढूनही काँग्रेसच्या १२ जागा वाढल्या. मुंबईत २ लाख मते वाढूनही आम्ही जागा गमावल्या. आठ जागा ४ टक्क्यांपेक्षा कमी मतांनी गमावल्या. याचा अर्थ ही निवडणूक घासून झाली. ही आकडेवारी पाहिल्यावर भाजपा आणि महायुतीला मतदारांनी नाकारले हा प्रचार चुकीचा आहे. कोणत्याही परिस्थितीत यावेळी भारतीय जनता पार्टीला पराभूत करायचेच, त्यासाठी कोणत्याही थराला जायचेच, अशा मनस्थितीत विरोधक होते. समाजमाध्यमांच्या मदतीने मतदार विचलित होतील, मतदाराच्या मनात भीती निर्माण होईल, अशा पद्धतीच्या अफवा पसरविल्या गेल्या. देशात अस्थिरता निर्माण करण्याचाच हा प्रयत्न होता.

महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षासाठी अक्षरश: जीवाचे रान केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीत ११५ प्रचार सभा घेतल्या. राज्याच्या कानाकोपऱ्यात जाऊन मतदारांपुढे पक्षाची भूमिका मांडत श्री. फडणवीस यांनी पक्षाचे समर्थपणे नेतृत्व केले. प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी लोकसभा निवडणुकीत संघटना स्तरावर १४७ बैठका त्याखेरीज नमो संवाद, सुपर वॉरियर्स मेळावे यासारख्या १०० हून अधिक बैठकांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबरीने

**१९८४ मधील पराभवानंतर हताश न होता आपण जिद्दीने उभे राहिलो. त्यावेळी देशभरातील कार्यकर्त्यांकडून आपलं काय चुकलं याबाबत मते मागवण्यात आली होती. त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांच्या म्हणजे काँग्रेसजनांच्या टवाळीने आपण खचलो नाही. त्यातूनच आपला पक्ष हळूहळू वाढत गेला आहे. पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील सर्व राज्यांमध्ये आपण अस्तित्वातही नव्हतो. आपल्या कार्यकर्त्यांनी अनेक वर्षे परिश्रम करून या राज्यांमध्ये आपली संघटना तयार केली आहे. दक्षिणेतही आपण हातपाय पसरत आहोत.**

श्री. बावनकुळे यांनी ६९ जाहीर सभा घेतल्या. महाराष्ट्रात आणि काही राज्यांमध्ये आमच्या काही जागा कमी झाल्या असल्या तरी अनेक राज्यांमध्ये आम्ही १०० टक्के यश मिळवले आहे. ज्या राज्यात आमची कामगिरी अपेक्षेनुसार झालेली नाही तेथे धोरणात्मक, संघटनात्मक पातळीवर काही चुका होत्या का, याचा आमचे नेतृत्व विचार करेल. काही चुका या दोन्ही पातळीवर झाल्या असतील तर त्या दुरुस्त ही केल्या जातील. प्रत्येक निवडणुकीतून भारतीय जनता पार्टीचे नेतृत्व आणि संघटना काही ना काही शिकत गेली आहे. त्यामुळेच १९८४ च्या दोन जागांपासून आमचा प्रवास २०१९ मध्ये म्हणजे ३५ वर्षात ३०० च्या पलीकडे जाऊन पोहोचला होता. सलग तीन निवडणुकीत बहुमत मिळवणे ही मोठीच कामगिरी आहे. काही धक्के जरूर बसले आहेत. त्याचाही सर्वांगीण विचार होईल. अशा छोट्या-मोठ्या धक्क्यांनी आमचे नेतृत्व आणि संघटना विचलित होत नसते. म्हणूनच अटलजींच्या शब्दात सांगायचे झालं तर

*'बाधाये आती है आएँ*
*अपमानों में, सम्मानों में,*
*उन्नत मस्तक, उभरा सीना,*
*पीड़ाओं में पलना होगा।*
*कदम मिलाकर चलना होगा।*

सत्ता हे अंतिम उद्दिष्ट नसल्याने आम्ही आजवर प्रत्येक निवडणुकीतून मिळालेले धडे लक्षात ठेवत निर्धाराने वाटचाल करत आहोत. या पुढील काळातही पूर्वीच्याच निर्धार शक्तीने आम्ही पुढचे पाऊल टाकू. ■

# ईशान्य भारताचा भाजपालाच आशीर्वाद!



२०२४ च्या लोकसभा निवडणूक निकालाची मोठी चर्चा सर्वत्र चालू आहे. भाजपाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशमध्ये भारतीय जनता पार्टीला अपेक्षित यश मिळाले नाही. पण, याउलट भाजपने ईशान्य भारतातील ८ राज्यांतील २५ पैकी १३ जागांवर विजय मिळवला आहे. कधीकाळी ईशान्य भारतात अस्तित्वहीन असलेल्या भाजपासाठी ही कामगिरी सुखावणारीच म्हणावी लागेल.

**मुख्य** प्रवाहातील भारतीय माध्यमं ईशान्य भारताकडे दुर्लक्ष करतात, हा आरोप कायमच केला जातो आणि या आरोपांमध्ये काही प्रमाणात तथ्यही आहेच. ईशान्य भारतातील छोटी-छोटी राज्ये, लोकसभेच्या दृष्टीने कमी असलेले संख्याबळ यामुळे राष्ट्रीय राजकारणात ईशान्य भारताची म्हणावी तशी चर्चा गेली कित्येक वर्षं होत नव्हती. २०१४ पूर्वी या भागाकडे सरकारी पातळीवरसुद्धा सर्वांगीण दुर्लक्षच वाट्याला आले. त्यामुळेच ईशान्य भारतात बेकायदेशीर धर्मांतरण, परदेशी ताकदींचा हस्तक्षेप वाढला अन् यातूनच या भागात अंतर्गत अशांततेला खतपाणी घातले गेले. पण, मागील एक दशकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात रालोआ सरकारने ईशान्य भारतात शांतता प्रस्थापित करण्याचे काम केले. त्यासोबतचं पायाभूत सुविधांच्या विकासामुळे हा भाग देशाच्या इतर भागांसोबत जोडला गेला. त्याचेच परिणाम आता, ईशान्य भारतातील राजकारणावरही प्रकर्षाने उमटलेले दिसतात. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या हिंदी पट्ट्यात पक्षाला अपेक्षित यश मिळाले नसताना, ईशान्य भारतात भाजपाने चांगली

कामगिरी केली. एवढेच नाही, तर भाजपाने अरुणाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीतसुद्धा एकहाती वर्चस्व निर्माण केले.

जेथे सूर्य सर्वप्रथम उगवतो ते भारतातील ठिकाण असं ज्याचं वर्णन केलं जातं, त्या अरुणाचल प्रदेशमध्ये लोकसभेबरोबरच यावेळी विधानसभेच्या निवडणुकादेखील पार पडल्या. २ जूनला अरुणाचल प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला. अरुणाचलच्या विधानसभेच्या ६० जागांपैकी ४६ जागांवर भाजपाने विजय मिळवता. अरुणाचलमध्ये आपले एकहाती वर्चस्व कायम राखले. विधानसभेप्रमाणेच अरुणाचलमधील दोन लोकसभा जागांवरही भाजपाने विजय मिळवला. केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनी अरुणाचल पश्चिम लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या नबाम तुकी यांचा एक लाख मताधिक्याने पराभव केला. अरुणाचल प्रदेशप्रमाणे सिक्कीममध्येसुद्धा लोकसभा निवडणुकीबरोबरच विधानसभेच्या निवडणुका होत्या. सिक्कीममध्ये भाजपा आणि काँग्रेसचं राजकीय अस्तित्व नगण्य आहे. सिक्कीममधील लढाई ही 'सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा' आणि 'सिक्कीम डेमोक्रेटिक फ्रंट' यांच्यात होती. या लढाईत प्रेमसिंह तमांग यांच्या सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाने एकहाती बाजी मारली. भाजपाला सिक्कीमच्या विधानसभेत खातं उघडता आलं नसलं, तरी पक्षाला एकूण मतांच्या ५.१८ टक्के मतं मिळाली. तर, सिक्कीममध्ये काँग्रेसला मोठ्या नामुष्कीला सामोरे जावे लागले. काँग्रेसला सिक्कीममध्ये 'नोटा'पेक्षाही कमी मतदान मिळाले.

ईशान्य भारतातील सर्वात मोठे राज्य म्हणजे आसाम, संपूर्ण ईशान्य भारतातील २५ लोकसभेच्या जागांपैकी एकट्या आसाममध्ये १४ जागा आहेत. मुख्यमंत्री हिमता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वात आसाम भाजपाचा गड अभेद्य बनला आहे. आसाममध्ये भाजपाने यावेळी १४ पैकी नऊ जागांवर विजय मिळवला. २०१९ मध्ये भाजपाला आसाममध्ये सात जागांवर विजय मिळाला होता. भाजपाला यावेळी दोन जागांचा फायदा झाला आहे. बांगलादेशी घुसखोर, 'सीएए' कायद्याची अंमलबजावणी यांसारख्या मुद्द्यांवर आसामची निवडणूक यंदा गाजली.

एकेकाळी डाव्यांचा गड असलेल्या त्रिपुरामध्ये भाजपाने आपले पुरेपूर राजकीय वर्चस्व या निवडणुकीतही कायम ठेवले. त्रिपुरातील लोकसभेच्या दोन्ही जागांवर भाजपाने निर्विवाद विजय मिळवला. त्रिपुरा पश्चिम लोकसभा मतदारसंघातून त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री बिप्लबकुमार देव यांनी विजय मिळवला, तर त्रिपुरा पूर्व लोकसभा मतदारसंघातून भाजपच्या कृती देवी देबबर्मन विजयी ठरल्या. २५ वर्षे डाव्यांची सत्ता असलेल्या त्रिपुरात भाजपाने २०१८ मध्ये 'कमळ' फुलवल होतं. तेव्हापासून भाजपाने त्रिपुरात एकहाती वर्चस्व निर्माण केले आहे. भाजपचे हेच वर्चस्व या निवडणूक निकालातूनही दिसून आले. त्रिपुराव्यतिरिक्त मिझोरामच्या एका जागेवर 'झोराम पीपल्स मूव्हमेंट' या स्थानिक पक्षाचा विजय झाला, तर मेघालयमधील दोन जागांपैकी एका जागेवर काँग्रेसचा, तर एका जागेवर 'व्हॉईस ऑफ द पीपल पार्टी'ने विजय मिळवला. त्यासोबतच नागालँडची एक जागाही काँग्रेसने जिंकली. मागच्या काही काळापासून ईशान्य भारतातील सर्वाधिक चर्चेत राहिलेले राज्य म्हणजे मणिपूर. मागच्या एक ते दीड वर्षापासून जातीय हिंसाचारात होरपळून निघालेल्या मणिपूरमध्ये अद्यापही संपूर्ण शांतता आलेली नाही. मैतेयी आणि कुकी या दोन जातसमूहांमध्ये चालू असलेला हिंसाचार आता थांबला असला तरी, अधून-मधून मणिपूरमधील फुटीरतावादी तत्त्वे डोकं वर काढतात. त्यामुळे मणिपूरचा हिंसाचार थांबवण्यात राज्य सरकारला म्हणावं तसं यश मिळालेलं नाही. याचा फटका भाजपाला लोकसभा निवडणुकीत बसला. मणिपूरमधील दोन्ही जागांवर भाजपाचा पराभव झाला.

ईशान्य भारतातील 'अष्टलक्ष्मी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आसाम, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मणिपूर आणि सिक्कीम, या राज्यांचे सत्तास्थापनेच्या दृष्टीने राष्ट्रीय राजकारणात महत्त्व काही राजकीय पक्षांना आजही वाटत नसले तरी देशाच्या आंतरिक सुरक्षेसाठी ही राज्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. हा भाग चारही बाजूने नेपाळ, बांगलादेश, चीन आणि म्यानमारच्या सीमांनी वेढलेला आहे. त्यात चीन हा आपला पारंपरिक शत्रू. चीन अरुणाचल प्रदेशवर आपला दावाही सांगतो, तर म्यानमारमध्ये सध्या गृहयुद्ध चालू आहे. त्यासोबतच बांगलादेश आणि नेपाळ ही आपली मित्रराष्ट्र असली तरी, या देशातही मोठ्या प्रमाणावर भारतविरोधी शक्तींचं अस्तित्व आहे. त्यामुळे अशा संवेदनशील राज्यांमध्ये भाजपासारख्या राष्ट्रवादी विचारांच्या पक्षांचा राजकारणावर प्रभाव असणे, देशहिताचेच! ■

# दक्षिणेतील भाजपाचे यश...

● विनय जोशी

## केरळ

**इथे** संघकामाचा अफाट विस्तार आहे पण आजपर्यंत कम्युनिस्ट आणि काँग्रेस आघाड्या यांच्यात विभागलेल्या राजकारणात एकदाही भाजपाला राजकीय यश मिळालेलं नव्हतं. गेल्या चार, पाच लोकसभा निवडणुकांमध्ये केरळमध्ये भाजपा खातं उघडणार अशा अपेक्षा केवळ अपेक्षाच राहिल्या होत्या. यावेळी मात्र भाजपाने थ्रिसुरची जागा जिंकून आपलं खातं उघडलं आहे. २०१९ मध्ये भाजपा आघाडीला १५.६४% मतं मिळाली होती ती २०२४ मध्ये १९.२३% झाली आहेत. शिवाय ११ विधानसभा मतदारसंघात भाजपाला यावेळी पहिल्या क्रमांकाची मतं मिळाली आणि एकूण २० लोकसभा जागांपैकी १ जागा जिंकून भाजप ११ लोकसभा मतदारसंघात क्रमांक २ वर आहे, म्हणजेच लोकसभा निवडणुकीपुरता भाजपा इथे प्रमुख विरोधी पक्ष ठरलेला आहे. भाजपाचा हा धडाका काँग्रेस आणि कम्युनिस्ट आघाड्यांसाठी मोठी धोक्याची सूचना आहे. आजपर्यंत प्रोफेसर जोसेफ यांचे इस्लामची बदनामी केल्याप्रकरणी जिहाद्यांनी तोडलेले हात, शेकडो ख्रिश्चन मुलींचं गल्फच्या पैशावर जिहाद्यांनी केलेलं अपहरण आणि लव्ह जिहादच्या कटू सत्यापासून कम्युनिस्ट पिनराई विजयन यांनी पळण्याचा केलेला सततचा प्रयत्न, काँग्रेसची संघटात्मक पातळीवर होणारी सततची घसरण यामुळे भाजपा जनमानसांत आपली प्रतिमा आणि राजकीय शक्ती वाढवत आहे. कम्युनिस्ट राजकीय शक्तींचा हा शेवटचा गड आहे. भाजपाचा आजपर्यंत इथे एकमेव आमदार आहे आणि एखाद दोन नगरपालिका, तरीही या लोकसभेत पक्षाला मिळालेली मते ही विरोधकांसाठी धक्कादायक आहेत.

## तेलंगणा

गेल्या वर्षाच्या अखेरीस तेलंगणात विधानसभा निवडणुका झाल्या आणि चंद्रशेखर राव यांची भारत राष्ट्र समिती सत्तेबाहेर जाऊन काँग्रेस सत्तेत आली. भाजपा जुने विरूद्ध बाहेरचे नेते यांच्या संघर्षात या निवडणुकीत अनुकूलता असूनही फार यश मिळवू शकली नाही. पण लोकसभा भाजपासाठी घवघवीत यश देऊन गेली. २०१९ मध्ये असलेल्या ४ जागांच्या यावेळी ८ जागा झाल्या काँग्रेस ३ वरून ८ वर गेली, एकेकाळी ९ जागा वाली भा.रा.स. ९ वरून शून्यावर आली आणि यांची मतांची टक्केवारी ४१.२१% वरून घसरत १६.६८% वर आली, यांची घसरलेली मतांची टक्केवारी भाजपाने आणि काँग्रेसने आपल्या पदरात पाडून घेतली. भाजपाचा टक्का २०१९ च्या १९.६५% वरून यावेळी ३५.०८ टक्क्यांवर पोचला. केरळमध्ये भाजपा सध्यातरी तात्पुरता विरोधक म्हणून उदयाला आलेला असला तरी तेलंगणात भाजपाची मतांची आणि जागांची गेल्या काही निवडणुकीतली चढती कमान बघता इथे भाजपा अत्यंत मजबुतीने प्रमुख विरोधी पक्ष म्हणून स्थिरस्थावर झालेला दिसत आहे. याहून धक्कादायक २ बाबी अश्या कि भारासच्या उमेदवारांची अनामत रक्कम ८ लोकसभा मतदारसंघात जब्त झाली आणि त्यापैकी ६ भाजपाने जिंकले आणि एकूण १७ लोकसभा जागांपैकी १४ जागांवर भारास तिसऱ्या स्थानावर ढकलली गेली!



सुरेश गोपी यांनी भाजपाचे केरळमध्ये खाते उघडले. त्यांना केंद्रीय मंत्रीपद देण्यात आले.

## आंध्र प्रदेश

यावेळी आंध्र प्रदेशात भाजपाने तेलगू देशम पक्षाच्या मदतीने आपल्या जागा आणि मतांची टक्केवारी वाढवलेली असली तरी एकट्या भाजपाची इथली स्थिती काय आहे याचा नक्की अंदाज जोपर्यंत भाजपा स्वतंत्रपणे लढत नाही तोपर्यंत येणार नाही.

युतीमध्ये लढून भाजपा आणि तेलगू देशम या दोघांचाही मोठा फायदा झालेला आपल्याला बघायला मिळत आहे.

जन सेनेचा पवन कल्याण याची लोकप्रियता सुद्धा चंद्राबाबू नायडूंच्या उपयोगाला आलेली आहे. अन्यथा जगनमोहन रेड्डीची लोकप्रियता, सामान्य जनतेसोबत असलेला अफाट संपर्क आणि थेट ख्रिश्चन, मुस्लिम अनुनयाची राजकीय, आर्थिक धोरणे याच्या जोरावर त्याला पराभूत करणं एकट्या नायडूंना अशक्य ठरलं असतं.

भाजपाने युतीमुळे अधिक मोदी सरकारच्या दक्षिण केंद्रित धोरणांमुळे २०१९ च्या ०.९८% मतांच्या तुलनेत ११.२८% मतं मिळवत ६ लोकसभा जागा लढवून त्यापैकी ३ जागा जिंकल्या आणि अन्य २ जागा अत्यंत कमी फरकाने हरल्या. शिवाय विधानसभेत मागील वेळच्या ०.८४% मतांच्या तुलनेत यावेळी २.८३% मतं मिळवून लढलेल्या १० पैकी ८ विधानसभा जागा जिंकल्या. मागच्या लोकसभेत आणि विधानसभेत भाजपाला एकही जागा जिंकता आलेली नव्हती हे विशेष! तेलगू देशम, जन सेना आणि भाजपाच्या विजयामागे जगन रेड्डीची थेट चर्च अनुनयाची शैली हेही एक प्रमुख कारण होतंच, याचमुळे मुख्यमंत्री झाल्या झाल्या नायडूंच्या पहिल्याच तिरुपती दौऱ्यात त्यांनी हिंदूंच्या धर्मांतराच्या कारवायांना आळा घालण्याची आणि तिरुपती देवस्थानात अनागोंदी पसरवून तिथे घुसवलेल्या क्रिप्टो ख्रिश्चन लोकांची हकालपट्टी करण्याची घोषणा केलेली आहे! सध्याची आंध्र भाजपाची अवस्था बघता, स्वतंत्रपणे यश मिळवण्यासाठी भाजपाला अजून किमान २ निवडणुका मेहनत घ्यावी लागेल.

## कर्नाटक

२०१९ लोकसभा निवडणुकीत कर्नाटकात भाजपाने ५१.३८% मतांसह २७ पैकी २५ जागा आणि काँग्रेस, जनता दलाने प्रत्येकी १-१ जागा जिंकली होती, यावेळी भाजपने ८ जागा आणि ५% मतं गमावून १७ जागा जिंकल्या आणि काँग्रेस, जनता दलाने अनुक्रमे ९ आणि २ जागा जिंकल्या.

कर्नाटक भाजपासाठी महत्वाचं राज्य आहे कारण दक्षिणेत भाजपाने सर्वप्रथम याच राज्यात सत्ता मिळवली होती आणि नंतर परत एकदा सत्ता मिळाली होती. आता भाजपा इथे चांगलाच स्थिरावलेला दिसत आहे. एकेकाळच्या मजबूत जनता दलाला भाजपाने दुय्यम पक्ष बनवून टाकला आहे आणि आता इथे भाजपा, काँग्रेस यांच्या दरम्यान सत्ता फिरत राहणार.



अण्णामलाई यांनी एकहाती लढत पक्षाचा पाया विस्तारला.

## तामिळनाडू....

यावेळी तामिळनाडूत तरुण, तडफदार माजी पोलीस अधिकारी अण्णामलाईच्या नेतृत्वाखाली भाजपाने चांगलीच हवा केली होती. अण्णा द्रमुक सोबतची युती तोडून भाजपने एकट्याने लोकसभा लढवायचा निर्णय घेऊन अण्णाने राज्यभर वादळी पदयात्रा काढली. एन मन, एन मक्कल या नावाने ही यात्रा निघाली होती. यात्रेला तुफान प्रतिसाद मिळाला. लोकसभा प्रचार जसजसा पुढे सरकू लागला तसतशी स्वबळावर लोकसभा जागा जिंकायची पक्षाची आशा पल्लवित होत गेली. पण प्रत्यक्ष निकालात एकही जागा हाती लागली नाही, तरी त्यातून भाजपासाठी बऱ्याच सकारात्मक गोष्टी पुढे आल्या. भाजपा नेतृत्वाखालील आघाडीने ज्यात ३९ पैकी २३ जागा स्वतः भाजप लढली; एकूण १८.२७% मतं मिळवली, यात अण्णा द्रमुक आणि सत्ताधारी द्रमुक दोघांची मतं कमी होऊन ती भाजपाच्या खात्यात जमा झाली. या ३९ जागांपैकी १२ जागी भाजप आघाडी क्रमांक दोनवर होती आणि त्यातही दहा जागांवर भाजपा उमेदवार, कमळ चिन्हावर क्रमांक २ वर होते. तामिळनाडूच्या २३४ विधानसभा मतदारसंघांपैकी ८१ मतदारसंघात भाजपा आघाडी क्रमांक २ वर होती, याचा अर्थ विधानसभेच्या ३३% जागांवर भाजपा दुसऱ्या स्थानी होती. तामिळनाडू टोकाच्या द्रविडीयन राजकारणात गुरफटलेलं राज्य आहे. दक्षिण भारतीय राज्ये मिळून वेगळं राष्ट्र आहे, हिंदू आणि द्रविड यांचा कोणताही धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय संबंध नाही असं मानणारे अशा सगळ्यांचा बोलबाला असलेला आणि स्वतंत्र द्रविडीस्थान असावा, सनातन धर्म हा कॅन्सर आहे वगैरे जाहीरपणे ओरडणारी, चर्च समर्थित विचारधारा राजकीयदृष्ट्या प्रबळ असणाऱ्या ह्या राज्यात भाजपने एकट्याने मारलेली ही मुसंडी ही यावर्षीच्या भाजपाच्या राष्ट्रीय कामगिरीमध्ये सर्वोच्च आणि सर्वोत्तम मानली जावी! ■

# अनेक वर्षांच्या संघर्षानंतर ओडिशामध्ये मिळाली विजयश्री

भाजपाच्या लोकसभा निकालाच्या पार्श्वभूमीवर हरवलेला विजय म्हणजे ओडिशा! सलग २४ वर्षांची बिजू जनता दलाची एकहाती सत्ता भाजपाने उखडून यावेळी निर्भेळ विजय मिळवत ओडिशामध्ये आपलं पहिलं सरकार स्थापन केलं. जनजाती अर्थात ट्रायबल लोकसंख्येचा बोलबाला असलेलं, भारताची लोह आणि अन्य खनिजांची राजधानी आणि भारतीय पोलाद उत्पादनात आघाडीचं राज्य म्हणजे ओडिशा.



ओडिशाचे नवे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी यांच्या शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते.

**यावेळी** भाजपाने इथे लोकसभेच्या २१ पैकी २० जागा जिंकल्या आणि विधानसभेच्या १४७ पैकी ७८ जागा जिंकल्या. मागच्या लोकसभेत भाजपने इथे ८ जागा जिंकल्या होत्या आणि विधानसभेत २३! देशभर ४०० जागा आल्यास भाजपा राज्यघटना बदलेल आणि दलित, ट्रायबल लोकांचे विशेषाधिकार काढून घेईल हा दुष्प्रचार शिगेला पोचलेला असताना या ट्रायबल प्राबल्य वाल्या राज्यात भाजपने पहिलीवहिली एकहाती सत्ता मिळवली आहे. मागच्या विधानसभेच्या तुलनेत भाजपाने आपली मते ७.५% ने वाढवून ती ४०.२२% वर नेली आणि मागच्या लोकसभेच्या ३८.४% वरून आपली मते ४५.३४% वर नेली. ही वाढ भाजपा सर्वव्यापी झाल्याची खूण आहे. ग्रॅहम स्टेन्स या ऑस्ट्रेलियन मिशनऱ्याने इथे धर्मांतराचे केलेलं प्रयत्न आणि त्यातून त्याची झालेली हत्या यामुळे हे राज्य २५ वर्षांपूर्वी जागतिक चर्चेचं केंद्र ठरलं होतं, त्याच राज्यात राष्ट्रवादी चळवळीतून, तळागाळातून वर आलेला, सरपंच पदापासून आपली राजकीय वाटचाल सुरु करणारा मोहन चरण माझी नावाचा एक साधारण ट्रायबल कार्यकर्ता, कोणतीही राजकीय पारिवारिक पार्श्वभूमी नसताना राज्याचा मुख्यमंत्री बनणं ही बाब हिंदुत्ववादी, राष्ट्रवादी चळवळीच्या सर्वसामावेशकतेची, सामाजिक, भौगोलिक व्यापकतेची सगळ्यात मोठी निशाणी आहे! ओडिशाचा वनवासी भाग ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केलेल्या सांस्कृतिक विनाशामुळे त्रस्त आहे, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, वनवासी कल्याण आश्रम आणि संघ, शिवाय तेजस्वी संत महंत यांनी केलेल्या दशकांच्या अविरत परिश्रमांमुळे ह्या भागात मिशनरी एकमार्गी धर्म परिवर्तन करू शकले नाहीत. आता झालेल्या राजकीय परिवर्तनाने या सर्व संस्थांच्या धर्मरक्षणाच्या कामाला निश्चितच अनुकूलता मिळून अजून गती वाढेल याची आता खात्री पटत आहे. बिजू जनता दल सरकारच्या कार्यकाळात अखंड संघर्ष करावा लागला. आता त्या संघर्षाची फलश्रुती या विजयाने झाली आहे. ■

# आपण कुठे कमी पडलो का?

● **रवींद्र अनासपुरे**, प्रदेश मुख्यालय प्रभारी

> नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा सत्तेत आले आहे. या सरकारमधील मंत्र्यांचा शपथविधी नुकताच झाला. मंत्र्यांचे खातेवाटपही झाले आहे. महाराष्ट्रातील निकाल आपल्या सर्वांसाठी अनपेक्षित होते. २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकीत आपण ४२ आणि ४१ जागा मिळवत मोठा वाटा उचलला होता. यावेळी आपण ४५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवून मैदानात उतरलो होतो. हे उद्दिष्ट आपण साध्य करू शकलो नाही. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांच्या मनात निराशेची भावना येणे साहजिक आहे. सर्व कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी प्रचारासाठी मोठी मेहनत घेतली. तरीही आपल्याला उद्दिष्ट साध्य करण्यात अपयश आले, ही वस्तुस्थिती मान्य करण्यास हरकत नाही.

**धार्मिक** आधारावर भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेला मतदान करू नका, असे आवाहन करणारे फतवे, संविधान बदलले जाणार असे सांगून दलित मतदारांना संभ्रमित करण्यात झाल्याचे प्रयत्न, आदिवासी समाजाचे आरक्षण काढून घेतले जाणार, असे सांगत या समाजाच्या मनात भीती निर्माण करणे अशी अनेक कारणे समोर आली आहेत. समाज माध्यमांचा कुशल वापर करून काँग्रेस-उबाठा आणि शरद पवार गटाने भारतीय जनता पार्टीबद्दल मतदारांच्या मनात भय निर्माण करण्याचे जोरदार प्रयत्न केले. सातत्याने केलेल्या अपप्रचारामुळे काही समाज घटकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला. त्याचे परिणाम निकालाच्या रूपाने आपण पाहिले आहेत. या अपप्रचारावर कशी मात करायची, याचे रणनिती आपण आखणारच आहोत. विधानसभा निवडणुका काही महिन्यानी होणार आहेत. आपल्या सर्वांचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा जिंकेपर्यंत स्वस्त बसणार नाही, असा निर्धार जाहीर केला आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस आणि प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनी लोकसभा निवडणुकीत अविश्रांत मेहनत घेतली. याखेरीज राष्ट्रीय नेतृत्वानेही सभा, रोड-शो याद्वारे राज्यातील वातावरण ढवळून काढले.

विधानसभा निवडणुकीत आपल्याला देवेंद्रजींचे शब्द खरे करून दाखवण्यासाठी जिद्दीने मैदानात उतरायचे आहे. लोकसभा निवडणुकीतील निकालामुळे आलेले नैराश्य, मरगळ झटकून आपल्याला पुनश्च हरी ओम म्हणत कामाला लागायचे आहे. त्यासाठी काही गोष्टींचा आढावा घेणे आवश्यक बनले आहे. आपले नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एकूण मतदानाच्या ५० टक्के मते मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट आपल्यापुढे ठेवले होते. त्या दृष्टीने आपल्या सुपर वॉरिअर्स, शक्ती केंद्रप्रमुख, बूथप्रमुख या यंत्रणा कार्यरत झाल्या. ५० टक्के मते मिळवणे, नवीन मतदार नोंदणी करणे, नव मतदार संपर्क अभियान, लाभार्थी संपर्क अभियान अशा वेगवेगळ्या टप्प्यातून आपली यंत्रणा कार्यरत होती. लोकसभा निवडणुकी निकालांचा बारकाईने अभ्यास केला तर असे दिसते की, १० मतदारसंघात आपण ५ टक्क्यांपेक्षा कमी मतांनी पराभूत झालो आहोत. धुळे, लातूर, भंडारा, नगर, भिवंडी, अमरावती, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, बीड, नांदेड या त्या १० जागा आहेत. या सर्व ठिकाणी धार्मिक ध्रुवीकरणाचा फटका आपल्याला बसला आहे. तरीही या मतदारसंघात आपण ३-४ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान वाढवू शकलो असतो तर या जागा आपण निश्चित जिंकल्या असत्या. यंदा भारतीय जनता पार्टी समर्थक मतदारांची नावे मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांमधून गायब झाल्याच्या तक्रारी राज्यभरातून करण्यात येत होत्या. लोकसभा निवडणुकीच्या काही महिन्याआधी आपण मतदार चेतना अभियान राज्यभर राबवले होते. या

अभियानात **मतदारांच्या पत्त्यांची दुरुस्ती करणे, संशयास्पद मतदारांच्या नावांना हरकत घेणे, आपल्या हक्काच्या मतदारांची नावे यादीत आहे ना, याची खातरजमा करून घेणे, नव मतदारांची नोंदणी करणे अशा अनेक कामांचा या अभियानात समावेश होता. या कामात आपण कुठं कमी पडलो का? याचा विचार प्रत्येकाने अंतर्मुख होऊन केला पाहिजे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी ही कामे अत्यंत उपयुक्त ठरतात. अनेक मतदारसंघात मतदानाच्या दिवसापर्यंत उमेदवाराच्या नावाच्या चिठ्ठ्या पोहचल्या नव्हत्या, अशा अनेक तक्रारीही आल्या आहेत. आपली सर्व यंत्रणा मैदानात उतरूनही अशा तक्रारी का याव्यात, हे ही प्रत्येक कार्यकर्त्याने, पदाधिकाऱ्याने तपासून पाहायला हवे.** आपला मतदार विजय गृहीत धरून मतदानाला बाहेरच पडला नाही का, हे ही आपण मतदार याद्या समोर ठेऊन पाहिले पाहिजे. मुंबईत मतदानाचा टक्का वाढवण्यात आपण का कमी पडलो, यासारखे प्रश्न आपण स्वत:ला विचारले नाहीत आणि त्याची उत्तरे प्रामाणिकपणे दिली नाहीत तर निकालानंतरच्या विचारमंथनाला अर्थ उरणार नाही. देशासाठी, पक्षासाठी समर्पित कार्यकर्त्यांची फौज हे आपल्या पक्षाचे अनेक वर्षांपासूनचे बलस्थान आहे. **मतदारांना घरी जाऊन मतदानासाठी बाहेर काढणे, हे अत्यंत महत्वाचे काम असते. आपली बूथ समिती या कामात कमी पडली आहे का? हे बूथप्रमुखांनी तसेच शक्ती केंद्रप्रमुखांनी मतदार यादी समोर ठेवून तपासणे आवश्यक बनले आहे. आपल्या मित्र पक्षाच्या उमेदवाराने ५० टक्के मते मिळवण्याचे उद्दिष्ट साध्य केले. मग आपण हे उद्दिष्ट का साध्य करू शकलो नाही, याचा विचार संघटनेच्या सर्व पातळ्यांवर होणारच आहे. उत्तर मध्य मुंबई आणि उत्तर पूर्व मुंबई मतदारसंघात आपल्या हक्काचे आणि सहानुभूतीदारांचे मतदान थोड्या प्रमाणात वाढले असते तर या जागा आपण निश्चित जिंकल्या असत्या.** धुळे मतदारसंघात केवळ एका मतदारसंघातील प्रचंड आघाडीमुळे प्रतिस्पर्धी उमेदवार तीन-साडेतीन हजारांच्या मताधिक्याने विजयी झाला. अन्य ५ विधानसभा मतदारसंघात आपल्या उमेदवाराला आघाडी आहे. ही आघाडी आणखी ५-६ हजारांनी वाढली असती म्हणजे ५ मतदारसंघात प्रत्येकी एक-एक हजाराची आघाडी आपल्याला मिळाली असती तर ही जागाही आपण जिंकू शकलो असतो. एक-एक मत किती महत्वाचे आहे, हे या निवडणुकीत आपल्याला कळले आहे. पंकजाताई मुंडे यांच्या मतदारसंघातही आणखी काही हजारांनी आपले मतदान वाढले असते तर विजयाचा गुलाल आपणच उधळला असता.

मतदार यादी आपल्यासाठी भगवत्गीतेप्रमाणे आहे, मतदार यादीची पारायणे झाली पाहिजेत तरच आपण प्रत्येक बूथची लढाई जिंकू शकू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्याला नेहमी सांगतात. **पंतप्रधानांनी आपल्याला बूथची लढाई जिंकण्याचा कानमंत्र दिला होता. आपल्यावर जबाबदारी सोपवण्यात आलेल्या बूथवर झालेले एकूण मतदान, त्यापैकी आपल्याला मिळालेले मतदान, प्रतिस्पर्धी उमेदवाराला झालेले मतदान याचा तुलनात्मक अभ्यास आपण सर्वांनीच आता करण्याची गरज आहे. असा विचार प्रामाणिकपणे केला तर आपल्याला आपण कोठे कमी पडलो हे कळू शकेल.** आपण आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली, असे म्हणत स्वत:ची पाठ थोपटून घेण्यात धन्यता मानून घेऊ नका. याचे कारण आपण कुठेतरी कमी पडलो म्हणूनच निकाल असा दिसतो आहे. केंद्रातील सत्ते महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असेल, असे वचन आपले नेते देवेंद्र फडणवीस आणि प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले होते. आपल्या पक्षाच्या एकूण जागा राष्ट्रीय पातळीवर ६० ने कमी झाल्या आहेत. आपला पक्ष जिंकणारच आहे, मग मी आपल्या उमेदवारासाठी प्रयत्न केले नाहीत म्हणून काहीच बिघडणार नाही, असा विचार करून आपण गाफील राहीलो का? हे ही प्रत्येकाने स्वत:च्या अंर्तमनाला विचारले पाहिजे. विधानसभा निवडणुकीत आपल्याला कोठेही गाफीलपणा, ढिलाई परवडणारी नाही, हे प्रत्येक कार्यकर्त्यांने आणि पदाधिकाऱ्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. ऑक्टोबरमध्ये विधानसभा निवडणुका होतील, असा अंदाज आहे. आपल्या हातात साडेतीन महिने म्हणजे १०० दिवस आहेत. या काळात मतदार यादीचा बारकाईने अभ्यास करून आपल्या मतदारांची नावे वगळली गेली असतील तर ती पुन्हा समाविष्ट करण्यासाठी तातडीने कामाला लागणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नव मतदारांच्या नोंदणीला सुरूवात केली पाहिजे. आपल्याला १३० हून अधिक विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळालेली आहे. त्यामुळे झाले-गेले विसरून जाऊन पुनश्च हरी ओम म्हणत कामाला लागा. ■

# धार्मिक ध्रुवीकरणाचा मतदानातील परिणाम

**लोकसभा** निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मतदार करू नये, असे फतवे सर्वच मतदारसंघात काढले गेले होते. कोणत्याही परिस्थितीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार पराभूत झालेच पाहिजेत. या हेतूने हे फतवे निघाले होते. महाविकास आघाडीच्या उमेदवारांची नावे टाकून त्यांनाच मतदान करावे, असे या फतव्यांमध्ये स्पष्टपणे नमूद केले होते. या फतव्यांमुळे कोण-कोणत्या विधानसभा मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांना किती आघाडी मिळाली, याची आकडेवारी सोबत दिली आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचे हे अस्त्र महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत उपकारक ठरले. धुळे, भिवंडी, नांदेड, परभणी, जालना, बीड, धाराशिव, अमरावती, यवतमाळ, दक्षिण मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई अशा १२ मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार धार्मिक ध्रुवीकरणामुळे विजयी झाले. धार्मिक आधारावर भारतीय जनता पार्टीच्या विरोधात मतदान झाल्याने महाविकास आघाडीला झालेला फायदा या आकडेवारीतून स्पष्ट दिसतो आहे. सीएए कायद्यामुळे मुस्लिमांना देशाबाहेर काढणार, असा अपप्रचार काँग्रेसने देशभर केला. समाज माध्यमांच्या मदतीने मुस्लिम असुरक्षित बनल्याचा खोटा प्रचार सर्वदूर केला गेला. याचा जोडीला संविधान बदलले जाण्याची अफवाही पसरविली गेली. एवढे होऊनही आपण १६ जागी विजय मिळवला आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. २०१४ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार राज्यात सत्तेत होते त्यावेळी काँग्रेस-राष्ट्रवादीला लोकसभेच्या अवघ्या ६ जागा मिळाल्या होत्या. आपण पुन्हा सत्तेबाहेर राहिलो तर आपले अस्तित्व संपून जाईल, या भीतीने काँग्रेसने समाज माध्यमांचा कुटील वापर करून भारतीय जनता पार्टीविरोधात मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केला. अशा अपप्रचारांचे आयुष्य मर्यादित असते, हे काँग्रेस आणि उबाठाने लक्षात ठेवावे. विधानसभा निवडणूक होण्यास अजून ३-४ महिन्याचा कालावधी निश्चित आहे. या काळात आपल्याबद्दल निर्माण केले गेलेले गैरसमज दूर करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत.


## मुस्लिमबहुल विधानसभा मतदारसंघातून 'मविला'ला मिळालेली आघाडी

| | |
|---|---|
| मालेगाव मध्य – | १,९४,३२७ |
| भिवंडी पूर्व – | ६२,७४१ |
| भिवंडी पश्चिम – | ६०,४८० |
| कळवा-मुंब्रा – | ६५,५०८ |
| नांदेड उत्तर – | ४०,५९५ |
| नांदेड दक्षिण – | १८,०९४ |
| परभणी – | ४२,४०० |
| जालना – | ९,७९० |
| सिल्लोड – | २७,७५९ |
| बीड – | ६२,३१२ |
| उस्मानाबाद – | ६०,४२३ |
| अकोला पश्चिम – | १२,०७१ |
| बुलडाणा – | २,२५५ |
| कामठी – | १७,५३४ |
| अमरावती – | ४१,६४८ |
| कारंजा – | २०,९६२ |
| मुंबादेवी – | ४०,७७९ |
| वांद्रे पूर्व – | २७,४६२ |
| वांद्रे पश्चिम – | ३,६०६ |
| शिवाजीनगर-मानखुर्द – | ८७,९७१ |
| सायन कोळीवाडा – | ९,३१२ |
| भायखळा – | ४६,०६६ |
| कुर्ला – | २३,५६४ |
| अणुशक्तीनगर – | २९,०८३ |


# मोदी सरकारचा शपथविधी



पंतप्रधान नरेंद्र मोदी



अमित शाह, गृहमंत्री



राजनाथ सिंह, संरक्षण मंत्री




नितीन गडकरी, परिवहन मंत्री



जे.पी.नड्डा, आरोग्य, रसायने खते मंत्री



निर्मला सीतारमन, अर्थ मंत्री



डॉ. एस. जयशंकर, परराष्ट्र मंत्री



पीयूष गोयल, वाणिज्य मंत्री



शिवराजसिंह चौहान, कृषी मंत्री



रामदास आठवले, सामाजिक न्याय राज्यमंत्री



रक्षा खडसे, युवा व क्रीडा राज्यमंत्री



मुरलीधर मोहोळ, नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp

# धन्यवाद भारत...



**प्रति,**

________________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com